# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड | बुधवार । दि. १० जून २०२६ । अंक ४ । पृष्ठे ८ । किंमत ४ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


### अटल सेतूवरुन आत्महत्या

**पनवेल :** पुणे जिल्ह्यातील शिरूर येथे राहणाऱ्या प्रतीक रासकर (वय २८) या तरुणाने अटल सेतूवरून समुद्रात उडी घेतल्याची घटना मंगळवारी पहाटे घडली. शेअर बाजारात काम करणारा प्रतीक जेवायला बाहेर जातो, असे सांगून रविवारी रात्री घरातून बाहेर पडला आणि मंगळवारी पहाटे कार घेऊन थेट अटल सेतूवर पोहोचला. सुरक्षा यंत्रणेची नजर चुकवत त्याने समुद्रात उडी मारली. या दुर्घटनेची माहिती मिळाल्यानंतर उलवे पोलिसांनी आणि बचाव पथकाने घटनास्थळी धाव घेऊन त्याचा शोध सुरू केला.

### तळेगाव एमआयडीसीमध्ये गॅस गळती

**तळेगाव :** तळेगाव एमआयडीसी परिसरात शॅफ्लर इंडिया कंपनीत कार्बन डायऑक्साइड गॅस गळतीची गंभीर घटना घडली. यामध्ये दोन कामागारांचा मृत्यू झाला. सुरुवातीला गॅस सिलेंडर स्फोटाची माहिती समोर आली होती, मात्र प्राथमिक माहितीनुसार कंपनीत गॅस गळती झाल्याचे स्पष्ट झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या दुर्दैवी दुर्घटनेत गणेश उंबरे आणि वैभव थोरात या दोन कामगारांचा जागीच मृत्यू झाला; तर श्रीकृष्ण साहू, गौरीशंकर शर्मा आणि नरसिंह पाटील हे तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत.

## वेधक

### ॲट्रॉसिटीसह विनयभंगाचा गुन्हा

**नवीन पनवेल :** महिलेला जातीवाचक शब्द वापरून विनयभंग केल्याप्रकरणी सुदर्शन देशमुख यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सुदर्शन देशमुख याने पीडित महिलेला जातीवाचक अपशब्द वापरून जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. यावेळी पीडितेने नकार दिला असता त्याने त्याची गाडी थांबवली आणि जबरदस्तीने विनयभंग केला. हा प्रकार फेब्रुवारी ते मार्च यादरम्यान घडला. या प्रकारामुळे पीडित महिला मानसिक तणावात होती. पुढे काय करावे हे समजत नसल्याने तिने सोमवारी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

### चिमुकलीवर अत्याचार; नराधमाला बेड्या

**गडचिरोली :** चामोर्शी शहरात घराचे रंगकाम करणाऱ्या एका युवकाने सात वर्षीय चिमुकलीवर अत्याचार केल्याची घटना घडली. आरोपीला चामोर्शी पोलिसांनी अटक केली असून प्रज्वल भांडेकर असे त्याचे नाव आहे. पीडित बालिकेच्या राहत्या घरात सध्या रंगकामाचे काम सुरू आहे. बालिका घराच्या गच्चीवर खेळत होती. यावेळी तिथे रंगकाम करत असलेल्या प्रज्वल याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. घटनेनंतर पीडित बालिकेला शारीरिक त्रास होऊ लागल्याने कुटुंबीयांच्या मनात संशय आला. त्यांनी तात्काळ तिला वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात नेले. वैद्यकीय अहवालात बालिकेवर अत्याचार झाल्याचे स्पष्ट होताच कुटुंबीयांना धक्काच बसला.

### भारताची १२ अण्वस्त्रे तैनात

**नवी दिल्ली :** जागतिक पातळीवर भू-राजकीय तणाव वाढत असतानाच भारताने आपल्या अण्वस्त्र धोरणात एक अत्यंत मोठा आणि ऐतिहासिक बदल केल्याचे समोर आले आहे. भारताने पहिल्यांदाच आपल्या १२ अण्वस्त्रांची प्रत्यक्ष तैनाती केली आहे. विशेष म्हणजे, वर्ष २०२५ पर्यंत भारताने एकही अण्वस्त्र अशा प्रकारे थेट तैनात केले नव्हते. मात्र, २०२६ मध्ये भारताच्या अण्वस्त्रांचा एकूण साठा १८० वरून वाढून १९० झाला असून, त्यातील १२ अण्वस्त्रे आता हाय-अलर्ट मोडवर तैनात करण्यात आली आहेत. भारताचे अण्वस्त्र धोरण हे नेहमीच नो फर्स्ट युज या तत्त्वावर आधारित राहिले आहे. सिप्रीने भारताची १२ अण्वस्त्रे तैनात श्रेणीत दाखवली आहेत.

# किनाऱ्यावर हायटेक पहारा

- बंदरांवर **150** सीसीटीव्हींची करडी नजर,
- गुन्हेगारी प्रतिबंधासाठी उपयुक्त यंत्रणा
- नागरिकांसह पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांचे पाऊल




**प्रमोद जाधव**
। रायगड ।

रायगड जिल्ह्यातील नागरिक आणि पर्यटकांच्या सुरक्षेसाठी रायगड पोलिसांनी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. जिल्ह्यातील प्रमुख बंदर आणि पोर्ट परिसरात तब्बल दीडशे सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून संशयास्पद हालचालींवर आता रात्रंदिवस लक्ष ठेवले जात आहे. औद्योगिकीकरण झपाट्याने वाढत असल्याने रायगड जिल्ह्यात विविध मोठे प्रकल्प उभे राहत आहेत. गेल आणि आरसीएफच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पांचे काम सुरू असून रोजगारासाठी राज्यभरातून तसेच परराज्यातून कामगारांचा ओघ वाढला आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षेचा धोका लक्षात घेऊन पोलिसांनी बंदर परिसरात कडेकोट नजर ठेवली आहे.

#### पोलिसांची भूमिका अधिक सक्रिय

सीसीटीव्ही नेटवर्कच्या मदतीने संशयास्पद हालचाली, बेकायदेशीर प्रवेश, तसेच किनारी भागातील अनधिकृत घडामोडींवर तत्काळ कारवाई करणे शक्य होणार आहे. यामुळे केवळ पर्यटकच नाही तर बंदरांवरील व्यापारी आणि औद्योगिक सुरक्षा व्यवस्थेलाही मोठा दिलासा मिळणार आहे. पोलीस प्रशासनाच्या मते, ही यंत्रणा भविष्यात आपत्ती व्यवस्थापन, गर्दी नियंत्रण आणि गुन्हेगारी प्रतिबंधासाठीही अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

दुसरीकडे, रायगड जिल्हा पर्यटनासाठीही प्रसिद्ध असल्याने अलिबाग, मांडवा, नागाव, मुरूड, काशीद, श्रीवर्धन यांसारख्या समुद्रकिनाऱ्यांवर वर्षभर लाखो पर्यटक भेट देतात. गेट वे मांडवा आणि भाऊचा धक्कामांडवा या सागरी मार्गांवरही मोठी गर्दी असते. या सर्व पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत समुद्रकिनारे, जेट्टी आणि पोर्ट परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. यात धरमतर पोर्ट ५१, दिघी पोर्ट २१, मांडवा जेट्टी २४, सानेगाव जेट्टी १६ तर इतर ठिकाणी लहान प्रमाणात कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या सीसीटीव्ही नेटवर्कमुळे बंदर, किनारे आणि पोर्ट परिसरातील प्रत्येक हालचालीवर पोलिसांचे बारकाईने लक्ष राहणार असून संभाव्य धोके टाळण्यासाठी ही यंत्रणा महत्त्वाची ठरणार आहे. पान २ वर

## हमरापूरमध्ये महिलेचा संशयास्पद मृत्यू

। पेण । प्रतिनिधी ।

शितोळे आदिवासीवाडी, हमरापूर फाटा परिसरातील टेकडीवरील झाडीझुडपात एका ३५ वर्षीय महिलेचा अर्धनग्न अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत महिलेची ओळख आंबी जान्या जाधव (वय ३५, रा. भोगुर्ली, महालमिऱ्या डोंगर, ता. पेण) अशी झाली आहे. संबंधित महिला काही दिवसांपासून पती व आई-वडिलांपासून वेगळी राहत होती. ती स्वतःहून पेण येथे आली होती.

सोमवारी (दि.८) महामार्गालगतच्या झाडीझुडपात तिचा मृतदेह संशयास्पद अवस्थेत आढळून आला.

मृत महिलेच्या भावाने पेण पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणातून महिलेच्या तोंडावर कठीण वस्तूने वार करून तिची हत्या केल्याचा संशय व्यक्त केला आहे. पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह अर्धनग्न अवस्थेत झाडीत टाकून आरोपी फरार झाल्याची शक्यता तपासात व्यक्त करण्यात येत आहे.

या प्रकरणी पेण पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला असून अज्ञात आरोपीचा शोध सुरू आहे. घटनास्थळी फॉरेन्सिक पथकाने पाहणी करून पुरावे संकलित केले आहेत. झाडीझुडपांमध्ये तपास सुरू असून उपविभागीय अधिकारी जालिंदर नालकुंड त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप बागुल अधिकचा तपास करत आहेत.

## कार अपघातात तरूणाचा मृत्यू

- दोन भरधाव वाहनांमध्ये समोरासमोर धडक
- ट्रेलर चालकाला पोलिसांनी घेतले ताब्यात

। पेझारी । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील पेझारी, आंबेपूर येथील तरुण नयन नंदकुमार पाटील (वय २८) याचे मंगळवारी (दि.९) सकाळी पाच वाजण्याच्या सुमारास वडखळ अलिबाग रस्त्यावरील संजीवनी हॉस्पिटल समोर कार अपघातात निधन झाले.

सोमवारी मैत्री दिन असल्यामुळे नयन पाटील हा आपल्या मित्रांना घेऊन मुंबई येथे आपल्या मित्राची ब्रिझा मारुती कार घेऊन गेला होता. सकाळी उशिरा परतत असताना वडखळ येथील जेएसडब्ल्यू कंपनीच्या संजीवनी हॉस्पिटलसमोर त्याची कार व ट्रेलर या दोन वाहनांमध्ये समोरासमोर धडक झाल्याने नयन नंदकुमार पाटील याचा जागीच मृत्यू झाला.



नयन नंदकुमार पाटील हा आंबेपूर पेझारी येथील अत्यंत गुणी व सुस्वभावी मुलगा होता. तो या परिसरात शिवभक्त म्हणून सुपरिचित होता. ढोलपाडा आंबेपूर येथील शिवभक्त जयकुमार पाटील यांचा तो पुतण्या होता. सकाळी पाच वाजता त्याच्या मृत्यूची बातमी पेझारी येथे येताच परिसरात शोककळा पसरली. त्याच्यावर आंबेपूर स्मशानभूमीत दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता.

त्याच्यामध्ये पत्नी, आई वडील, एक बहीण, काका, व इतर मोठा परिवार आहे. सदर अपघाताची नोंद वडखळ पोलीस ठाणे येथे झाली असून वडखळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक व त्यांचे ठाणे अंमलदार, पोलीस कर्मचारी अपघाताची कसून चौकशी करत आहेत. सदर अपघातातील वाहन चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असल्याचेही कळते.

## पोलीस पाटीलांची पदे तात्काळ भरा

### शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांची मागणी

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

पोलीस, महसूल आणि नागरिक यांच्यामधील महत्वाचा दुवा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रायगड जिल्ह्यातील पोलीस पाटील यांची १ हजार १२१ पदे रिक्त आहेत. महसूल आणि पोलीस प्रशासनासाठी जोडणारा शासनाचा महत्वाचा प्रतिनिधी असलेल्या पोलीस पाटील यांची रिक्तपदे भरणे गरजेचे आहे. त्यामुळे शासनाने ही पदे तात्काळ भरावीत, अशी मागणी शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी केली आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

जिल्ह्यातील महसूली गावे २ हजार ११८ आहेत. ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजारहून अधिक आहे. जिल्ह्यात ८६८ पोलीस पाटील कार्यरत आहेत. जिल्ह्यातील गावे, वाड्यांमधील कायदा व सुव्यवस्थेची माहिती देण्याचे तसेच महसूल प्रशासनाला मदत करण्याचे काम कार्यरत पोलीस पाटील यांच्या मार्फत केले जाते. गाव-वाड्यांमध्ये शांतता आणि कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्ह्यांची माहिती देणे, आपत्कालीन परिस्थितीत मदत करणे, निवडणुकीत मदत करणे. दरोडा, शांतता भंग किंवा इतर गुन्हेगारी कृत्यांपासून गावाला सुरक्षित ठेवणे, गैरवर्तन किंवा दुर्लक्षाच्या घटनांची माहिती पोहोचवणे, अशा अनेक प्रकारची कामे पोलीस पाटील करतात. ग्रामीण भागात शांतता राखण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे.



जिल्ह्यात सध्या १ हजार १२१ पदे रिक्त असल्याची माहिती समोर आली आहे. पोलीस पाटीलची पदे भरली नाहीत. त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न गंभीर झाला आहे. जिल्ह्यात सात उपविभागीय कार्यालये आहेत. यामध्ये अलिबाग, कर्जत, माणगाव, रोहा, महाड या उपविभागीय कार्यालयाच्या अखत्यारित दीडशेहून अधिक पदे रिक्त आहेत. श्रीवर्धन, पनवेल या उपविभागीय कार्यालयाच्या अखत्यारित शंभरहून अधिक आणि पेण कार्यालयाच्या अख्यत्यारित येणारी ९५ पोलीस पाटील यांची पदे रिक्त आहेत. पोलीस पाटील हा गाव पातळीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि ग्रामस्थांना पोलीस प्रशासनाशी जोडणारा शासनाचा प्रतिनिधी आहे. गावाचा कारभार सुरळीत चालविण्यासाठी रिक्त असलेल्या पोलीस पाटील यांची पदे भरणे ही गरज आहे. सुशिक्षित बेरोजगारी ही सध्या एक अत्यंत गंभीर आणि आव्हानात्मक समस्या बनली आहे. पदवी प्राप्त करूनही तरुणांना त्यांच्या पात्रतेनुसार, रोजगाराची संधी मिळत नाही. त्यामुळे तरुण वर्गात प्रचंड निराशा पसरत आहे. जिल्ह्यामध्ये सुशिक्षित बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

रायगड जिल्ह्यात रिक्त असलेली पोलीस पाटील यांची पदे तातडीने भरण्यासाठी योग्य कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी केली आहे.

## पाच मित्र वर्धा नदीत बुडाले

- इंदिरा नगर परिसरावर दुःखाचा डोंगर
- पथकाकडून युद्धपातळीवर शोधकार्य सुरू

। चंद्रपूर । वृत्तसंस्था ।

पोहण्यासाठी गेलेल्या पाच मित्रांचा वर्धा नदीत बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना चंद्रपूरमध्ये घडली. जिल्ह्यातील घुग्गूस शहरालगत असलेल्या माथारदेवी गावाजवळील नदी काठावर सोमवारी (दि.८) ही घटना घडली. सम्यक देवराव सोनटक्के (१८), संनी अशोक आस्मपेल्ली (१९), रोहित बाबाराव बोबडे (१९), शिव भास्कर केलझरकर (१९), तन्मय नवनाथ पथाडे (१८) अशी मयत मित्रांची नावे आहेत. सर्वजण घुग्गूस शहरातील इंदिरा नगर परिसरातील रहिवासी आहेत.

हे पाचही तरूण सोमवारी पोहण्यासाठी वर्धा नदीकाठी गेले होते. मात्र ते घरी परतले नसल्याने त्यांचा शोध सुरू करण्यात आला. नदीकाठी कपडे आणि मोबाईल आढळून आल्याने बुडाल्याची भीती व्यक्त करण्यात आली. दरम्यान, मंगळवारी सकाळी पुन्हा सुरू करण्यात आलेल्या शोधमोहीमे दरम्यान बचाव पथकाला एका युवकाचा मृतदेह बाहेर काढण्यात यश आले आहे. अद्याप उर्वरित चार युवकांचा शोध सुरू आहे.

पोलीस, आपत्ती व्यवस्थापन आणि बचाव पथकाकडून युद्धपातळीवर शोधकार्य सुरू आहे. बेपत्ता सर्व युवकांचे वय अंदाजे १५ ते १७ वर्षांच्या दरम्यान असल्याची माहिती समोर आली आहे.

## मच्छिमारांना दुष्काळ जाहीर करा

### विजय गिदी यांची मागणी



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

वादळी वारे, बदलते हवामान, समुद्रातील प्रदुषण, मासळीचे घटते प्रमाण अशा अनेक कारणांमुळे मासेमारीवर मोठा परिणाम होऊ लागला आहे. कृषी दर्जा असूनही कोणत्याही प्रकारचा लाभ मच्छिमारांना मिळत नाही, असा आरोप महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ, मुंबईचे माजी अध्यक्ष, तथा महालक्ष्मी मच्छिमार सोसायटीचे चेअरमन विजय गिदी यांनी करीत मच्छिमारांना दुष्काळ जाहीर करून त्यांना अर्थसहाय्य देण्यात यावे, अशी मागणी केली आहे. याबाबत मुरूडच्या तहसीलदारांना पत्र देण्यात आले आहे. रायगड जिल्ह्याला २४० पान २ वर

> मच्छिमारांना कृषी दर्जा असून योजनेचा लाभ मिळत नाही. मच्छिमार मोठ्या संकटात सापडला आहे. सरकारने गांभिर्याने दखल घेत महाराष्ट्रातील मच्छिमारांना शेतकऱ्यांप्रमाणे प्रत्येक व्यक्तीस अर्थसहाय्य करावे. याबाबत मुरूडच्या तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे.
>
> – विजय गिदी, चेअरमन महालक्ष्मी मच्छिमार सहकारी संस्था, राजपुरी

## पावसाळ्यासाठी कोकण रेल्वे सज्ज

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

कोकणात मान्सून दाखल होण्याच्या पार्श्वभूमीवर कोकण रेल्वेने सुरक्षेसाठी विशेष तयारी सुरू केली आहे. अतिसंवेदनशील रेल्वे मार्गांवर रात्रीची गस्त वाढविण्यासह धोकादायक ठिकाणी चोवीस तास वॉचमन तैनात करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर कोकण रेल्वे महामंडळाच्या सुरक्षा विभागातर्फे रत्नागिरी येथे पावसाळी गस्तीविषयी सुरक्षा परिसंवाद आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले आहे. पावसाळ्यात दरड कोसळणे, रेल्वे रुळावर माती घसरणे, पाणी साचणे किंवा अन्य नैसर्गिक अडथळे पान २ वर

#### डायरीची देवाणघेवाण ठरणार महत्त्वाची

प्रत्येक गस्ती कर्मचाऱ्याला पाच किलोमीटरपर्यंतचा मार्ग सोपविण्यात येतो. शेजारच्या विभागातील गस्ती कर्मचाऱ्यांमध्ये गस्ती डायरीची देवाणघेवाण केली जाते. ही प्रक्रिया सुरळीत पार पडल्यास संबंधित रेल्वेमार्ग सुरक्षित असल्याचा महत्त्वाचा संकेत मिळतो. परिसंवादादरम्यान गस्ती डायरी देवाणघेवाणीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. तसेच ही प्रक्रिया अडथळ्यांमुळे खंडित झाल्यास किंवा आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास गस्ती कर्मचाऱ्यांनी कोणती कार्यपद्धती अवलंबावी, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**शाळेला लावावी लागणार ५० झाडे | राज्यात लावणार ५३ लाखांहून अधिक झाडे**

## शाळांना वृक्षारोपणाचे उद्दिष्ट

। रायगड । प्रतिनिधी ।

नवे शैक्षणिक वर्ष सुरू होताच राज्यासह देशभरातील शाळांना वृक्षारोपणाचे काम करावे लागणार आहे. एक पेड माँ के नाम या उपक्रमाच्या तिसऱ्या पर्वात केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने महाराष्ट्राला ५ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत ५३ लाखांहून अधिक झाडे लावण्याचे उद्दिष्ट दिले असून, त्यानुसार राज्यातील प्रत्येक शाळेला किमान ५० झाडे लावावी लागणार आहेत.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी याबाबत शिक्षणाधिकाऱ्यांना परिपत्रकाद्वारे आदेश दिला आहे. यंदाच्या पर्यावरण दिनाच्या अनुषंगाने घेण्यात आलेली हवामान बदल ही संकल्पना आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०च्या धोरणानुसार विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय समस्यांबद्दल संवेदनशीलता निर्माण करणे, त्यांच्यात पर्यावरणाबाबत जबाबदार वृत्ती, वर्तन रुजवण्याचा उद्देश आहे. एक पेड माँ के नाम ३.० ही वृक्षारोपण मोहीम शाळांतील इको क्लबच्या माध्यमातून देशभरातील शाळांमध्ये ५ जून ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत राबवली जाणार आहे. या मोहिमेंतर्गत सन २०२६-२७ साठी ५३ लाख १ हजार २५७ झाडे लावण्याचे उद्दिष्ट महाराष्ट्राला देण्यात आले आहे. त्यानुसार प्रत्येक शाळेने किमान ५० झाडे लावणे क्रमप्राप्त आहे, असे नमूद करण्यात आले आहे.




झाडे लावण्यासाठी शाळेच्या आवारात पुरेशी जागा उपलब्ध नसल्यास घरातील उपलब्ध जागा, रस्त्याच्या कडेला, शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यावर झाडे लावता येऊ शकतात. तसेच, विद्यार्थ्यांनी आतापर्यंत लावलेल्या रोपांचे अस्तित्व, देखभाल आणि नियमित निरीक्षण सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, मिशन लाइफसाठी शाळांमध्ये इको क्लबची व्याप्ती वाढवणे, विद्यार्थी, शिक्षक आणि स्थानिक समुदाय सहभाग वाढवण्यासाठी उपाययोजना करून १०० टक्के उद्दिष्टपूर्ती करण्याबाबत सूचना द्याव्यात, असे डॉ. पालकर यांनी स्पष्ट केले आहे.

#### इको क्लबच्या माध्यमातून ग्रीन समर कॅम्प

शाळांतील इको क्लबच्या माध्यमातून ५ ते ३० जून या कालावधीत ग्रीन समर कॅम्प आयोजित करण्यात येणार आहे. त्यात शिक्षणाला निसर्गातील अनुभवांशी जोडण्याचा प्रयत्न आहे. हे शिबिर निरोगी जीवनशैलीचा अवलंब, शाश्वत अन्नप्रणाली, ई-कचरा कमी करणे, ऊर्जाबचत, पाणीबचत, एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर थांबवणे या संकल्पनांवर आधारित असू शकते. शिबिरामध्ये या संकल्पनांशी संबंधित उपक्रम राबवावेत. उपक्रमांची माहिती, केलेल्या वृक्षारोपणाची माहिती http://ecoclubs.education.gov.in या संकेतस्थळावर दिली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## पेरणीची घाई टाळा

### हवामान विभागाने दिला बळीराजाला सल्ला



। रायगड । प्रतिनिधी ।

हवामान विभागाने राज्यातील जनतेसाठी आणि विशेषतः बळीराजासाठी अत्यंत महत्त्वाचे अपडेट दिले आहे. बहुप्रतीक्षित मान्सूनने अखेर महाराष्ट्रात एन्ट्री घेतली असून काही जिल्ह्यांमध्ये त्याचे रीतसर आगमन झाले आहे. देशात यंदा ४ जून रोजी दाखल झाल्यानंतर मान्सूनने आता राज्यातील काही भागात प्रगती केली आहे. येत्या काही दिवसांत तो उर्वरित महाराष्ट्रात देखील सक्रिय होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, पुढील ३ दिवसांसाठी राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

यंदाचा मान्सून अरबी समुद्राच्या काही भागांसह महाराष्ट्रातील दक्षिण कोकणातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीमध्ये दाखल झाला आहे. याशिवाय पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर या जिल्ह्यांमध्येही मान्सूनचे आगमन झाले आहे. हवामान विभागाचे प्रमुख डॉ. एस. डी. सानप यांनी दिलेल्या माहितीनुसार, येत्या ४ ते ५ दिवसांत मान्सून महाराष्ट्रातील आणखी काही भागांमध्ये पुढे सरकण्यासाठी अत्यंत अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे.

सध्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह जोराचा पाऊस होत आहे. मात्र, हा सर्व पाऊस मान्सूनचा नसल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर वगळता इतर ठिकाणी पडत पान २ वर

# शक्तिपीठ महामार्गाविरोधात जनआंदोलन

। कोल्हापूर । प्रतिनिधी ।
गेल्या काही दिवसांपासून सातत्याने विरोध आणि टीकेच्या केंद्रस्थानी राहिलेल्या शक्तीपीठ महामार्गाचा विरोध करण्यासाठी मंगळवारी कोल्हापूरमध्ये आंदोलन केले. शक्तिपीठ महामार्गाला विरोध करण्यासाठी आंदोलकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. या मोर्चामध्ये छत्रपती शाहू महाराज, शेतकरी नेते राजू शेट्टी आणि काँग्रेस नेते सतेज पाटील हे सहभागी झाले होते. या मोर्चासाठी महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

आम्हाला आत्महत्या करायला लागली तरी चालेल, आमचे रक्त सांडलं तरी चालेल, मात्र आम्ही शक्तीपीठ महामार्ग होऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका आंदोलनातील महिलांनी घेतली. या मोर्चासाठी कोल्हापूर जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले शेतकरी एकटवले. आमच्या जमिनी विकल्यानंतर आमच्या पोरा-बाळांची लग्न कशी होणार, असा सवाल देखील महिलांनी उपस्थित केला आहे.

यासंदर्भात प्रसारमाध्यमांशी बोलताना सतेज पाटील यांनी म्हटले की, आंदोलक आणि शेतकऱ्यांना नको असलेला शक्तिपीठ महामार्ग करु नये. कोणत्याही परिस्थितीत आम्ही हा मार्ग होऊ देणार नाही. शक्तीपीठ महामार्गाला समांतर असा नागपूर-रत्नागिरी मार्ग आहे. मग असे असताना नव्या मार्गाची गरज काय? सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यात अनेक अल्पभूधारक शेतकरी आहेत. हे सगळे शेतकरी शक्तीपीठ महामार्ग झाल्यास भूमिहीन होतील. कोल्हापूर जिल्ह्याला पावसाचा आणि महापूराचा तडाखा बसतो. शक्तीपीठ महामार्ग झाल्यास महामार्गामुळे अनेक हेक्टर शेती उद्ध्वस्त होईल. या महामार्गामुळे ७३ ते ७६ गावांमधील शेतजमीन जाणार आहे.

सांगली जिल्ह्यात शक्तीपीठ महामार्ग साठी होणाऱ्या ड्रोन मोजणीस शेतकऱ्यांनी विरोध दर्शवला आहे. खानापूर तालुक्यातील विटा जवळील नागेवाडी, माऊली भाग्यनगर येथील शेतकऱ्यांनी शक्तिपीठ महामार्गाच्या ड्रोन मोजणीस विरोध दर्शवला आहे.

वर्धा ते कोकणातील बांधापर्यंत एकूण ८०५ किलोमीटरचा शक्तिपीठ महामार्ग असणार आहे. राज्यातील वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या १२ जिल्ह्यांतून शक्तीपीठ महामार्ग जाणार आहे. हा महामार्ग सहा पदरी असेल. महामार्गावर २६ ठिकाणांवर इंटरचेंज असेल. ४८ मोठे पूल, ३० बोगदे, आठ रेल्वे क्रॉसिंग असतील. शक्तिपीठ महामार्गासाठी तब्बल ८६ हजार कोटी रुपयांचा खर्च येणार आहे.

या महामार्गामुळे बारा जिल्ह्यातील २७ हजार ५०० एकरांची जमीन हस्तांतरित होणार आहे. त्यामुळे शक्तिपीठ महामार्गाविरोधात कोल्हापुरातील शेतकरी आक्रमक झाले आहेत. ठेकेदारांची शक्ती वाढवण्यासाठी गरज नसताना महामार्गाचा घाट घातल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. हा महामार्ग वर्धा जिल्ह्यातून सुरू होऊन यवतमाळ, नांदेड, धाराशिवमार्गे सिंधुदुर्ग येथे संपणार आहे.

## या देवस्थानांना हा महामार्ग जोडणार

कोल्हापूर - अंबाबाई, तुळजापूर - तुळजाभवानी. नांदेड - माहूरची रेणुका देवी या तीन शक्ती पीठांना जोडणारा हा महामार्ग असणार आहे. परळी वैजनाथ, हिंगोली जिल्ह्यातील औंधा नागनाथ (नागेश्वर), माहूरची रेणुकादेवी, तुळजापूरची तुळजाभवानी, पंढरपुरचे विठ्ठल रखुमाई मंदिर, कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर, सोलापुरातील सिद्धरामेश्वर, अक्कलकोट, गाणगापूर, कारंजा (लाड), नृसिंहवाडी, औदुंबर या बारा देवस्थानांना हा महामार्ग जोडणार आहे.

पान १ वरून

## किनाऱ्यावर हायटेक पहारा

जिल्ह्यातील पर्यटकांसह नागरीकांच्या सुरक्षेसाठी रायगड पोलिसांनी कंबर कसली आहे. जिल्ह्यातील वेगवेगळ्या पर्यटनस्थळांसह लॅन्डींग पॉईंट आणि बंदराच्या ठिकाणी दीडशे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या सीसीटीव्ही कॅमेरांच्या मदतीने किनाऱ्यांसह बंदर, पोर्टच्या परिसरातील संशयीत हालचालीवर लक्ष ठेवण्याचे काम केले जात आहे. या प्रणालीमुळे प्रत्येक संवेदनशील ठिकाणावर रिअल-टाइम नजर ठेवता येणार आहे.

## मच्छिमारांना दुष्काळ जाहीर करा

किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. अलिबाग, पनवेल, पेण, मुरूड, रेवदंडा, किहीम, सासवणे, मांडवा, रेवस, नवगाव, बोर्ली, मुरूड, राजपूरी, श्रीवर्धन, दिवेआगर अशा अनेक भागात मोठ्या प्रमाणात मासेमारी करणारा वर्ग आहे. जिल्ह्यात सुमारे पाच हजार मासेमारी बोटी आहेत. त्यात काही यांत्रिकी आणि काही विना यांत्रिकी बोटींचा समावेश आहे. मासेमारी करून त्यांच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालविणारे मोठ्या प्रमाणात आहेत. खोल समुद्रात जाऊन मासेमारी करणे, बाजारात मासळी विकणे अशा अनेक प्रकारची कामे केली जातात. जून ते जूलै या कालावधीत मासेमारीला बंदी आहे. गेल्या तीन वर्षामध्ये वादळी वारे, अवकाळी पाऊस, बदलते हवामान अशा अनेक कारणामुळे मासळीचे प्रमाण घटत आहे. त्यामुळे मच्छिमार मोठ्या संकटात सापडले आहेत. मासेमारी व्यवसाय उभा करण्यासाठी मच्छिमारांनी बँकाकडून घेतलेले कर्ज फेडण्याची नामुष्की ओढावली आहे. त्यामुळे मच्छिमार कर्जबाजारी झाले आहेत. मच्छिमारांना आर्थिक संकटातून मुक्त करण्यासाठी दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांप्रमाणे अर्थसहाय्य करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ, मुंबईचे माजी चेअरमन विजय गिदी यांनी केली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा आदेश काढून शेतकऱ्यांना सरसकट दोन लाख रुपयांची कर्जमुक्ती योजना काढली आहे. याबाबत सर्व बँकांनी युध्द पातळीवर काम सुरु केले आहे. मात्र मच्छिमारांना कृषी दर्जा देऊनही कोणत्याही प्रकारचा लाभ देण्यात आला नाही. त्यामुळे मच्छिमारांना शेतकऱ्यांप्रमाणे प्रत्येक व्यक्तीस अर्थ सहाय्य करावे, अशी मागणी गिदी यांनी केली आहे.

## पावसाळ्यासाठी कोकण रेल्वे सज्ज

निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन रात्रीच्या गस्तीला विशेष महत्त्व देण्यात येत आहे. सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत गस्त घालणारे कर्मचारी आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवून असतात. कोणतीही असामान्य बाब आढळल्यास तत्काळ जवळच्या स्थानकप्रमुखांना माहिती देऊन आवश्यक उपाययोजना केल्या जातात.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन**

या परिसंवादाचे अध्यक्षस्थान कोकण रेल्वेचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संतोष कुमार झा यांनी भूषविले. तर संचालक (वे अँड वर्क्स) राजीव कुमार मिश्रा यांनी उपस्थितांना संबोधित केले. कार्यक्रमाला वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सुमारे १७५ जण उपस्थित होते. सुरक्षा मोहिमेअंतर्गत अग्निसुरक्षेबाबतही जनजागृती करण्यात आली. अग्निशामक यंत्रांचा योग्य वापर कसा करावा, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत कर्मचाऱ्यांची तयारी अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

## पेरणीची घाई टाळा

असलेला पाऊस हा नैऋत्य मान्सूनचा नसून तो पूर्वमोसमी वादळी पाऊस आहे. या पूर्वमोसमी पावसामध्ये काही ठिकाणी वादळी वाऱ्याचा वेग देखील जास्त असणार आहे. याच पार्श्वभूमीवर हवामान खात्याने राज्यातील अनेक भागांमध्ये पुढील ३ दिवसांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. राज्यात मान्सूनचे आगमन झाले असले आणि अनेक भागांत पाऊस पडत असला, तरी हवामान विभागाने शेतकऱ्यांना एक महत्त्वाचा सल्ला दिला आहे. सध्या काही भागातच मान्सून पोहोचला असल्याने शेतकऱ्यांनी घाईघाईने पेरणी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी राज्य शासन आणि कृषी विभागाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे आणि पुरेशा ओलीची खात्री करूनच पेरणीचा निर्णय घ्यावा.

हवामान विभागाने आगामी काळातील मान्सूनच्या स्थितीवरही प्रकाश टाकला आहे. सध्या प्रशांत महासागरामध्ये एल निनोची परिस्थिती विकसित होत आहे. हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, जुलै महिन्यापर्यंत हा एल निनो पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे आगामी काळातील पावसाच्या प्रमाणावर आणि वितरणावर याचा काय परिणाम होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे वढाव खुर्द, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्रीमती शालिनी शरद वर्तक, वगैरे राहणार चौल, ता.अलिबाग यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझ्या अशिलांनी रस्त्याच्या वहीवाटीच्या हक्कासहीत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरित झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्रीमती शालिनी शरद वर्तक, वगैरे यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर ) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| वढाव खुर्द ता.अलिबाग, | २३ | ०-३८-००<br>०-०१-०० पो.ख.<br>०-३९-०० एकूण | ९-३७ |

अलिबाग,
दिनांक : ०९/०६/ २०२६.

सही/
**(अॅड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग,
टिळक रोड, अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत सदरील मिळकतीचे विद्यमान मालक १) श्रीमती प्रतिभा रमेश पाटील, २) श्रीमती संगिता नितीन कळसकर, ३) श्रीमती शिल्पा हरेश वर्तक, ४) श्रीमती पल्लवी हर्षल राऊत, ५) श्री. पुष्कर सुरेश पाटील, ६) श्रीमती विजया सुरेश पाटील, ७) श्रीमती पंकजा रविंद्रनाथ घरत, सर्व रा.मापगाव, ता.अलिबाग, जि.रायगड यांचेकडून विकत घेण्याचे ठरविलेले आहे व त्याबाबत उभयपक्षी प्राथमिक चर्चा सुरू आहे. आमच्या अशिलांनी वर नमुद मालकांच्या सदरील मिळकतीबाबत मालकी हक्कांचा शोध घेऊन त्याप्रमाणे टायटल सर्च रिपोर्ट देण्याची विनंती केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भुमापन क्र. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| २२७ | ०-४८-७०<br>०-०७-३० | ११.१५ | सदरील मिळकतीपैकी वर नमुद क्र.१ ते ४ यांचे मालकीचे ०-२१-०० हे. आर इतके क्षेत्र. सदरील मिळकतीपैकी वर नमुद क्र.५ व ६ यांचे मालकीचे ०-१९-०० हे.आर इतके क्षेत्र. सदरील मिळकतीपैकी वर नमुद क्र.७ यांचे मालकीचे ०-१६-०० हे.आर इतके क्षेत्र. |

वर नमुद मिळकतींसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, वहिवाट, कुळ, ताबा, कब्जा, तारणगहाण, लिज, लिन, साठेकरार, बोजा, वहिवाटीचे मार्ग अथवा इतर कसल्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत योग्य त्या कागदपत्रांसह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ (आठ) दिवसांचे आत सादर करावी. वरील मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध आहेत असे समजण्यात येईल व त्याप्रमाणे टायटल सर्च रिपोर्ट देण्यात येईल व आमचे अशिल सदरील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक : १०/०६/२०२६

**अॅड. जयेश अ.जोशी**
९३२, टिळक रोड, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड

### E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.
**Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo.: 7000039954**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-22/ 2026-2027.**<br>RFx e-tender for Supply & Installation of eDAQ (Energy Data Acquisition) and Automatic log sheet generation with real time data monitoring and trending system for all make MFM and ABT meters at 100kV Taloja Substation under EHV (O&M) Dn Panvel**...2nd call.**<br>**Tender amount Rs. 15,76,299/-, EMD amount Rs. 15,763/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **09.06.2026, 18:00 Hrs. to 21.06.2026, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 21.06.2026 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **22.06.2026 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER (I/C)**
**E.H.V.(O&M) Dn. Panvel**

### महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
उप प्रादेशिक कार्यालय, तळोजा,

**पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी रद्द झाल्याबाबत जाहीर निवेदन**

वने, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय,भारत सरकार यांची अधिसूचना दि.१४.०९.२००६ अन्वये मे. टेसेमडेर्लो केर्ली इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (प्लॉट नं. ३०३, सेक्टर- ३, जेएनपीए सेझ, सावरखेड गाव, ता. उरण, जि. रायगड) यांच्या प्रस्तावित कॅल्शियम थायोसल्फेट (CaTs) आणि पोटॅशिअम थायोसल्फेट (KTS) उत्पादनांच्या निर्मिती संदर्भातील दि. १६.०६.२०२६ ची जाहीर सुनावणी प्रकल्प प्रवर्तकांच्या विनंतीव्दारे अनिश्चित काळासाठी रद्द करण्यात येत आहे.

सही/-
उप-प्रादेशिक अधिकारी

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.
**मौजे-गौरकामत तालुका कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १) दिनकर दामोदर जाधव (मयत) वारस<br>१) अमोल दिनकर जाधव<br>२) प्रज्ञा अतनु सिन्हा<br>३) अभिजीत दिनकर जाधव | ८४/२/अ/२ | एकूण क्षेत्र १-३०-०० | ०-६५ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहाणार नाही.

ठिकाण:- कर्जत
दिनांक :- १०/०६/२०२६
मो. नं. ९९२१०२३८९४

खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट.
**अॅड. योगेश का. देशमुख**
पत्ता: श्री गणेश प्रसाद सोसा. प्लॅट नं. १०४.
कदम वाड्या जवळ, स्टेशन रोड. कर्जत
ता. कर्जत जि. रायगड

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,
ज्याअर्थि मौजे वाशी, ता. पेण, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत असुन सदर मिळकतीचे विद्यमाने मालक/कब्जेदार यांचेकडून सदर मिळकत आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे-वाशी, ता. पेण, जि. रायगड येथिल**

| मालक/कब्जेदाराचे नाव | भुमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| कमलाबाई कृष्णा म्हात्रे<br>मिनाश्री भालचंद्र म्हात्रे<br>रघुपती कृष्णा म्हात्रे | ८ | २ | ०-६३.८० | ६.२५ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, अॅटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु. हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील कमलाबाई कृष्णा म्हात्रे वगैरे ३ यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि १०/०६/२०२६.

**श्री. तुषार द. देवरे,** अॅडव्होकेट
पत्ता : फ्लॅट नं. ए-२, जय नगर को.ऑप हौ.सोसा. लि.
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६
जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे-सापेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| सुनिल सदानंद कांबळे | ६ | ३ | १-५२-० | ० | ५९ |
| अनिल सदानंद कांबळे<br>सीमा सदानंद कांबळे | ६ | ५ | १-०१-० | ० | ३७ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**अॅड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-१०/०६/२०२६

### जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली जमिन मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) चौ. मि. | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| गोंधळपाडा ता.अलिबाग जि. रायगड | ९६/आय | क्षेत्र १.८९.००<br>पो.ख. ०.१५.००<br>एकूण क्षेत्र २.०४.००<br>पैकी<br>खरेदी क्षेत्र १.८९.०० | ४.०६ |

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे अॅडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व विनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : १०/०६/२०२६

सही/-
**अॅड. सचिन सदानंद पाटील**
मु. ७६२/ए/बी, आई बंगला,
शिवसागर वसाहत, कुरूळ
ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०९.
मो.नं. ९८८१६३७९२४ /७९७२७७९९०२
ई.मेल : sp3589166@gmail.com

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.
**मौजे-गौरकामत तालुका कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १) सुरेश जगत्यानी<br>२) अरुणा सुरेश जगत्यानी<br>३) आदिती जगत्यानी<br>४) सवितर सुरेश जगत्यानी | ८०/५/अ | एकूण क्षेत्र १-२०-०० | ०-५४ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहाणार नाही.

ठिकाण:- कर्जत
दिनांक :- १०/०६/२०२६
मो. नं. ९९२१०२३८९४

खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट.
**अॅड. योगेश का. देशमुख**
पत्ता: श्री गणेश प्रसाद सोसा. प्लॅट नं. १०४.
कदम वाड्या जवळ, स्टेशन रोड. कर्जत
ता. कर्जत जि. रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.
**मौजे-गौरकामत तालुका कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १) नवनीत निशान सिंग | ८३/२/अ/१ | एकूण क्षेत्र ०-४०-०० | ०-२३ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही.

ठिकाण:- कर्जत
दिनांक :- १०/०६/२०२६
मो. नं. ९९२१०२३८९४

खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट.
**अॅड. योगेश का. देशमुख**
पत्ता: श्री गणेश प्रसाद सोसा. प्लॅट नं. १०४.
कदम वाड्या जवळ, स्टेशन रोड. कर्जत
ता. कर्जत जि. रायगड

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेल्या मौजे मानकुळे, ता. अलिबाग जिल्हा रायगड येथील मिळकतीं त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांसकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. व सदरच्या मिळकतीं ह्या निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांने दिलेला आहे. सदर मिळकतींच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरिता व त्या मिळकतींच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | विद्यमान मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | | ८/३ | ०-४५-२०<br>पो.ख.०-०२-३०<br>एकुण क्षेत्र ०-४७-५० | ५.०० | धनाजी रामभाऊ सांदणकर |
| २ | | ९/२/ब | ०-४९-५०<br>पो.ख. ०-०२-१०<br>एकुण क्षेत्र ०-५१-६० | ६.३१ | धनाजी रामभाऊ सांदणकर |
| ३ | | १०/३ | ०-२७-६०<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकूण क्षेत्र ०-२९-१० | ३.५० | १) सुषमा अजितप्रसाद पाटील,<br>२) सिद्धार्थ अजितप्रसाद पाटील |
| ४ | मानकुळे ता.अलिबाग | ७८/३ | ०-५५-९०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकुण क्षेत्र ०-५६-४० | ६.७५ | अर्जुन बामा पाटील |
| ५ | | ७०/१/ब | ०-३६-९०<br>पो.ख.०-०८-१०<br>एकुण क्षेत्र ०-४५-०० | ६.४२ | प्रभाकर हरीभाऊ पाटील |
| ६ | | ७५/१ | ०-३९-५०<br>पो.ख.०-०२-५०<br>एकुण क्षेत्र ०-४२-०० | ४.८१ | प्रभाकर हरीभाऊ पाटील |
| ७ | | ७१/१ | ०-७१-००<br>पो.ख.०-०५-१०<br>एकुण क्षेत्र ०-७६-१० | ७.४४ | १) रत्नप्रभा राम म्हात्रे,<br>२) अरूण राम म्हात्रे,<br>३) अनिल राम म्हात्रे,<br>४) दिपक राम म्हात्रे,<br>५) अर्चना राजेंद्र पाटील,<br>६) सुचिता कृष्णकांत पाटील,<br>७) माधवी नवनाथ म्हात्रे,<br>८) शांताबाई जाखू पाटील,<br>९) ताई वामन म्हात्रे,<br>१०) बेबी वामन म्हात्रे |
| ८ | | ८८/३ | ०-३४-३०<br>पो.ख.०-०३-६०<br>एकुण क्षेत्र ०-३७-९० | ३.०० | जनार्दन गणपत पाटील, |
| ९ | | ८०/१ब | ०-५४-२० हे. आर पैकी<br>१) विजया केशव पाटील,<br>२) मनोज केशव पाटील,<br>३) प्रमोद केशव पाटील,<br>यांचे हिश्श्यांचे क्षेत्र ०-३८-२० हे. आर,<br>आकार ४.५८ रू. पै | ६.५० | विदयमान मालक केशव गणपत पाटील मयत तर्फे कायदेशीर वारस<br>१) विजया केशव पाटील,<br>२) मनोज केशव पाटील,<br>३) संदेश केशव पाटील,<br>४) प्रमोद केशव पाटील, |
| १० | | ९५/१ब | १-०८-५०<br>पो.ख.०-०७-४०<br>एकुण क्षेत्र १-१५-९० | १४.१३ | १) गुलाब ब्रम्हानंद पाटील,<br>२) रेशमा ब्रम्हानंद पाटील,<br>३) भूषण ब्रम्हानंद पाटील,<br>४) अभिजित ब्रम्हानंद पाटील,<br>५) सुषमा ब्रम्हानंद पाटील, |
| ११ | मानकुळे ता.अलिबाग | १०१/२/ब | ०-३०-३० | ३.५० | १) चंद्रकांत बाबु पाटील,<br>२) नारायण बाबु पाटील |
| १२ | | १०२/१ | ०-६९-५०<br>पो.ख. ०-०१-८०<br>एकुण क्षेत्र ०-७१-३० | ६.८१ | १) पार्वती शंकर ठाकूर,<br>२) सिंधू जगन्नाथ ठाकूर,<br>३) समिर जगन्नाथ ठाकूर,<br>४) चेतना जगन्नाथ ठाकूर,<br>५) प्रतिक्षा जगन्नाथ ठाकूर,<br>६) दर्शना अशोक म्हात्रे,<br>७) सुवर्णा विठोबा म्हात्रे,<br>८) सुशिला यशवंत ठाकूर,<br>९) संगिता जगदीश पाटील,<br>१०) प्रभावती राजाराम ठाकूर,<br>११) रविकांत राजाराम ठाकूर,<br>१२) सुर्यकांत राजाराम ठाकूर,<br>१३) प्रेमा चंद्रकांत चव्हाण,<br>१४) वंदना अनंत पाटील, |
| १३ | | १०४/१ | ०-५७-९०<br>पो.ख.०-०६-१०<br>एकुण क्षेत्र ०-६४-०० | ६.५० | अशोक पांडुरंग पाटील |
| १४ | | १०९/४ | ०-५४-९०<br>पो.ख.०-०१-८०<br>एकुण क्षेत्र ०-५६-७० | ६.१३ | काशिनाथ पांडुरंग पाटील |
| १५ | | ७/३/अ | ०-३४-१०<br>पो.ख.०-०२-३०<br>एकुण क्षेत्र ०-३६-४० | ४.३१ | अकबर हमजाभाई मिठीबोरवाला मे. अकबर एंटरप्राईजेस तर्फे |

तरी वरील मिळकतींचे संदर्भात कोणाचीही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त पोटगी साठेकरार वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि. कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १५ (पंधरा) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकतीं निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींच्या विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी कळावे,

अलिबाग,
दिनांक - ०९/०६/२०२६

सही/-
**अॅड. समिक्षा सिध्दार्थ शेंबेकर,**
जिल्हा न्यायालय, रायगड
पत्ता मु. लोणारे, पो. थळ,
ता. अलिबाग, जि. रायगड
पिन नं. ४०२२०७
मो. नं. ७७१९९०७२६१

# निवडक

## रासळमधील दिव्यांगांच्या लढ्याला यश

**सुधागड-पाली :** सुधागड तालुक्यातील रासळ येथील दिव्यांग बांधवांच्या तीव्र संघर्षानंतर अखेर प्रशासनाला नमते घ्यावे लागले आहे. हक्काच्या ५ टक्के निधीसाठी मंगळवारी (दि.९) पुकारण्यात येणारे सामूहिक उपोषण प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर स्थगित




झाले होते. या घडामोडींनंतर तत्परता दाखवत रासळ ग्रामपंचायतीतर्फे सर्व दिव्यांग नागरिकांना त्यांच्या हक्काच्या निधीचे थेट बँक खात्यात तर दोघांना चेक देऊन वाटप करण्यात आले आहे. निधी मिळाल्याने दिव्यांग नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. रासळ येथील २३ दिव्यांग रहिवाशांनी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील निधी मिळवण्यासाठी आवश्यक असलेली सर्व बिले मार्च २०२६ मध्येच जमा केली होती. मात्र, अडीच ते तीन महिने उलटूनही निधी न मिळाल्याने संतप्त दिव्यांगांनी थेट कोकण आयुक्तांपर्यंत धाव घेत मंगळवार दि.९ जूनपासून ग्रामपंचायत कार्यालयातच उपोषणाचा इशारा दिला होता. या इशाऱ्याची प्रशासनाने गंभीर दखल घेतली. सोमवारी (दि.८) प्रशासनाने दिव्यांग प्रतिनिधींना निधी देण्याचे ठोस आश्वासन दिले होते, त्याची पूर्तता मंगळवारी प्रत्यक्ष निधी वर्ग करून करण्यात आली. त्यामुळे दिव्यांगांवर उपोषणाला बसण्याची आलेली वेळ टळली असून, संपूर्ण सुधागड तालुक्यातून या यशस्वी लढ्याचे कौतुक होत आहे.



## ठेवीदारांचा संघर्ष पुन्हा तीव्र

**पनवेल :** कर्नाळा नागरी सहकारी बँकेतील ५ लाख रुपयांवरील ठेवी अद्याप परत न मिळाल्याने ठेवीदारांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. त्यामुळे जून महिन्याच्या अखेरीस कळंबोली सर्कल परिसरात मोठे रास्ता रोको आंदोलन करण्याचा निर्धार ठेवीदारांनी व्यक्त केला आहे. हे आंदोलन सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.पनवेल संघर्ष समितीच्या पाठपुराव्यामुळे आणि भारतीय रिझर्व्ह बँकेकडे सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे ५ लाख रुपयांपर्यंतच्या ठेवीदारांना विमा योजनेतून रक्कम मिळाली. मात्र, अजूनही सुमारे अडीच हजार ठेवीदारांचे तब्बल १६७ कोटी रुपये अडकून पडले असून, राज्य व केंद्र सरकार या प्रश्नावर प्रभावी तोडगा काढण्यात अपयशी ठरल्याचा आरोप ठेवीदारांनी केला. दरम्यान, पुढील १५ दिवसांत आणखी एक बैठक घेऊन आंदोलनाची अंतिम दिशा ठरवण्यात येणार आहे. यावेळी गणेश बडगुजर, मनोहर उरणकर, अमित ठाकूर, प्रदीप मोकळ, हेमंत घाडी, राजेश कोळी, अरविंद फडणवीस, के. पी. चटर्जी आणि नारायण राऊत आदी उपस्थित होते.

## कधी बरसणार मेघराजा?

**पाताळगंगा :** मान्सूनचे आगमन जवळ आले असले,



तरी अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांसह पाताळगंगा परिसरातील शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे लागल्या आहेत. खरीप हंगामाची तयारी पूर्ण झाली असून, अनेक शेतकऱ्यांनी नांगरणी, वखरणी आणि इतर पूर्वमशागतीची कामे उरकली आहेत. मात्र, पावसाने हजेरी न लावल्याने पेरणीची कामे रखडली आहेत. जून महिना सुरू होताच शेतकऱ्यांमध्ये शेतीकामांची लगबग वाढते. बियाणे, खते आणि औषधांची खरेदी करून शेतकरी पावसाची प्रतीक्षा करत आहेत. काही ठिकाणी हलक्या सरी कोसळल्या असल्या तरी मोठ्या प्रमाणावर पेरणी करण्याइतका पाऊस झालेला नाही. त्यामुळे शेतकरी चिंतेत असून लवकरच दमदार पाऊस पडावा, अशी अपेक्षा व्यक्त करत आहेत. शेतकऱ्यांनी पावसाचा अंदाज घेत शेतातील मान्सूनपूर्व कामे उरकून घेतली आहेत. काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात पावसाच्या सरी कोसळल्याने शेतकऱ्यांनी बियाणे देखील खरेदी केले आहे. काहींनीतर पेरणी देखील पुर्ण करून घेतल्या आहेत.शेती हा पावसावर अवलंबून असलेला प्रमुख व्यवसाय असल्याने वेळेवर आणि पुरेसा पाऊस पडणे अत्यंत आवश्यक आहे. पाऊस लांबल्यास पेरणीत विलंब होऊन उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता असल्याने शेतकरी वर्ग सध्या चिंताग्रस्त आहे. त्यामुळे ''कधी बरसणार मेघराजा?'' हा प्रश्न सध्या प्रत्येक शेतकऱ्याच्या मनात आहे.

# प्रशासनाची धडक कारवाई की धूळफेक?

### एक टपरी सील करून बहादुरी; अधिकाऱ्यांची पाठ फिरताच टपऱ्या पुन्हा सुरू

**| उरण | प्रतिनिधी |**

अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी राज्यभर भ्रष्टाचार, भेसळखोरी आणि बेकायदेशीर व्यवसायांविरोधात धडक मोहीम सुरू केल्यानंतर अनेक अधिकारी आणि व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत. मात्र, उरणमध्ये या मोहिमेचे रूपांतर केवळ 'दाखवायच्या कारवाईत' झाल्याची चर्चा आता उघडपणे होऊ लागली आहे. उरण शहरात वर्षानुवर्षे सुरू असलेल्या मोठ्या गैरप्रकारांकडे डोळेझाक करत केवळ एका पानटपरीवर कारवाई करून प्रशासनाने आपली जबाबदारी झटकली असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.



अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने नुकतीच उरणमधील एका टपरीवर कारवाई करून ती सील केली. मात्र, या कारवाईमुळे शहरातील बेकायदेशीर व्यवसायांवर किती परिणाम झाला, हा खरा प्रश्न आहे. उरणमध्ये अनेक ठिकाणी नियमांना हरताळ फासत खाद्यपदार्थांची विक्री, मुदतबाह्य वस्तूंची विक्री, अनधिकृत मेडिकल दुकाने, निकृष्ट दर्जाचे मिठाई उत्पादन, अस्वच्छ चायनीज सेंटर, बेकायदेशीर बार-रेस्टॉरंट, मटण-चिकन विक्री केंद्रे आणि विविध प्रकारचे खाद्य व्यवसाय खुलेआम सुरू आहेत. धक्कादायक बाब म्हणजे कारवाई होण्यापूर्वीच काही व्यावसायिकांना त्याची माहिती मिळाल्याची चर्चा शहरभर रंगली आहे. त्यामुळे अनेक संशयित व्यावसायिकांनी आपली दुकाने बंद ठेवली होती. परिणामी अधिकारी आले, एका टपरीवर कारवाई झाली, छायाचित्रे काढली आणि मोहीम संपली. त्यामुळे ही कारवाई कायद्याची अंमलबजावणी होती की, ठरवून केलेला देखावा, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. याहून गंभीर बाब म्हणजे अधिकाऱ्यांची वाहने शहराबाहेर पडताच बंद असलेल्या काही टपऱ्या आणि व्यवसाय पुन्हा सुरू झाल्याची चर्चा आहे. जर कारवाईनंतर काही तासांतच परिस्थिती पूर्ववत होत असेल, तर ही मोहीम जनतेच्या डोळ्यात धूळफेक करण्यासाठी होती का, असा संतप्त प्रश्न उरणकर उपस्थित करत आहेत.

स्थानिक नागरिकांच्या मते, उरणमध्ये अन्न व औषध प्रशासनाच्या

### कामकाजाच्या गुप्त चौकशीची मागणी


आयुक्त तुकाराम मुंडे यांनी राज्यभर अनेक ठिकाणी अचानक धाडी टाकून भ्रष्ट कारभार उघडकीस आणला आहे. त्यामुळे आता त्यांनी उरणमधील स्थानिक कार्यालयाच्या कामकाजाची गुप्त चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच, उरणमध्ये अचानक आणि पूर्वसूचना न देता छापे टाकले, तर अनेक धक्कादायक प्रकार उघडकीस येण्याची शक्यता देखील नागरिक व्यक्त करत आहेत. आयुक्त तुकाराम मुंडे यांनी स्वतः उरणमध्ये धडक देऊन वास्तव जाणून घेतले, तर अन्न व औषध प्रशासनाच्या स्थानिक कारभारातील अनेक 'गुपितांचे झाकण' उघडू शकते, अशी भावना आता नागरिकांमध्ये तीव्रतेने व्यक्त होत आहे.

काही अधिकाऱ्यांचे आणि काही व्यावसायिकांचे कथित आर्थिक साटेलोटे असल्यामुळे अनेक गंभीर गैरप्रकारांकडे वर्षानुवर्षे दुर्लक्ष केले जात आहे. शहरात कोणत्या हॉटेलमध्ये कोणते तेल वापरले जाते, कोणत्या मिठाई दुकानात स्वच्छतेचे नियम पाळले जात नाहीत, कोणत्या मेडिकलमध्ये नियमबाह्य औषधविक्री होते, कोणत्या बारमध्ये नियमांचे उल्लंघन होते, याची माहिती संबंधित यंत्रणांना नसणे अशक्य असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. उरणमध्ये अनेक ठिकाणी अस्वच्छ वातावरणात खाद्यपदार्थ तयार होत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत असून, काही ठिकाणी कालबाह्य खाद्यपदार्थ विक्रीचे आरोपही होत आहेत. तर, काही ठिकाणी परवान्यांशिवाय व्यवसाय सुरू असल्याच्या चर्चा होत आहेत. मात्र, अशा मोठ्या आस्थापनांवर कारवाई करण्याचे धाडस दाखवले जात नाही. त्यामुळे छोट्या टपरीवाल्यांवर धाड टाकून मोठ्या गैरप्रकारांना संरक्षण दिले जात आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# राजपूरी-खोकरी रस्ता मृत्यूचा सापळा

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

मुरुड तालुक्यातून रोहा, श्रीवर्धन व पुण्याकडे जाणारा जवळचा राजपूरी-खोकरी रस्त्या मृत्यूचा सापळा बनला आहे. या रस्त्याच्या दरम्यान समुद्र किनाऱ्यालगतचा संरक्षक कठडा गेल्या वर्षीच्या पावसाळ्यात कोसळल्याने हा रस्ता धोकादायक बनला आहे. वेळोवेळी या ठिकाणी तातडीने योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी वाहनचालक व प्रवासी वर्गातून केली जात आहे. परंतु, यंदाचा पावसाळा उजाडला तरी कोणतीही दुरुस्ती करण्यात न आल्याने त्यांच्यातून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.



मागील वर्षी मोठ्या प्रमाणात पडलेल्या पावसामुळे राजपूरी-खोकरी दरम्यान समुद्र किनाऱ्यालगतचा संरक्षक कठडा कोसळला होता. हा संरक्षक कठडा दुरूस्त व योग्य ती उपाययोजना करण्याबाबत राजपूरी ग्रामपंचायतीतर्फे मुरुडच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना लेखी निवेदन देण्यात आले होते. मात्र, अद्यापही या ठिकाणी कोणतीही उपाययोजना न करण्यात आल्याने वेळप्रसंगी अपघाताची शक्यता भिती व्यक्त केली जात आहे. याबाबत गेल्या महिन्यात कृषीवलच्या प्रतिनिधीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उप अभियंता यांच्याशी संपर्क साधला असता, राजपुरी-खोकरी दरम्यान

**■ वेळोवेळी पाठपुरावा करूनही प्रशासनाचे दुर्लक्ष**

समुद्र किनाऱ्यालगतचा संरक्षक कठडा बांधण्यात वरीष्ठ अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे. परंतु, अद्यापही या कामासाठी निधी प्राप्त झाला नसल्याचे सांगण्यात आले होते. आता मे महिना उलटून जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पावसाला सुरुवात देखील झाली, तरी या ठिकाणी संरक्षक कठडा बांधण्यात न आल्याने वाहनचालक व प्रवासी वर्गातून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

# 'आपले सरकार सेवा केंद्र सुरू'

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन येथे नगरपरिषद इमारत नजीक ''आपले सरकार सेवा केंद्र'' सुरू झाले आहे. या केंद्रामुळे विविध शासकीय दाखल्यांसाठी नागरिकांना व विद्यार्थ्यांना शासकीय कार्यालयांत हेलपाटे मारावे लागणार नाहीत. एकाच ठिकाणी सर्व महत्त्वाच्या सुविधा उपलब्ध झाल्याने दिव्यांग व्यक्ती, नागरिक व विद्यार्थी समाधान व्यक्त करीत आहेत.? सध्या शैक्षणिक प्रवेशाचा काळ सुरू असून विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, राष्ट्रीयत्व आणि उत्पन्नाचा दाखला अशा विविध कागदपत्रांची तातडीने गरज असते. या अगोदर कामांसाठी विद्यार्थ्यांना व पालकांना तहसील कार्यालयात




फेऱ्या माराव्या लागत असत. मात्र, आता हे केंद्र शहरातच सुरू झाल्याने विद्यार्थ्यांचा वेळ वाचणार आहे. दिव्यांग व्यक्तींसाठी केवायसी करीता तसेच नागरिक व महिलांकरिता हे केंद्र उपयुक्त ठरणार आहे. संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, नवीन रेशनकार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड अपडेट, आणि शेतीविषयक ७/१२ व ८-अ चे उतारे यांसारख्या अनेक सेवा येथे जलद गतीने मिळणार आहेत.

## वीज समस्यांवर मंत्रालयात बैठक

**| पनवेल | ग्रामीण प्रतिनिधी |**

पनवेल तालुक्यात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी राज्यमंत्री तथा विद्युत विभागाच्या मंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत वीजपुरवठ्याच्या समस्यांची लोकप्रतिनिधींनी सविस्तर माहिती दिली. मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी, विद्युत विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना वीज समस्यांवर तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

# पनवेलमधील नागरिक हैराण



**| पनवेल | प्रतिनिधी |**

नवीन पनवेल सेक्टर १३ परिसरात गेल्या काही दिवसांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. ऐन उन्हाळ्यात सततच्या वीज खंडितीमुळे घरगुती कामकाज, विद्यार्थ्यांचा अभ्यास तसेच व्यावसायिक व्यवहारांवर विपरीत परिणाम होत आहे.

नागरिकांनी महावितरणकडे वारंवार तक्रारी करूनही केबल फॉल्ट, ट्रान्सफॉर्मर ऑईल लिकेज आणि डीपीमधील तांत्रिक बिघाड, अशी कारणे देऊन वेळ मारून नेली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. समस्या कायमस्वरूपी सोडविण्याऐवजी तात्पुरत्या उपाययोजनांवर भर दिला जात असल्याने रहिवाशांमध्ये संतापाचे वातावरण आहे. विशेष म्हणजे, तक्रार नोंदविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास अनेकदा फोन उचलले जात नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

# माथेरान घाटातील गटारे भरलेली

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरानमध्ये येण्यासाठी असलेला नेरळ-माथेरान घाट रस्ता बांधकाम खात्याने अद्याप स्वच्छ केलेला नाही. आजही या रस्त्याच्या बाजूची गटारे दगड मातीने भरलेली आहेत. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात ही गटारे पाण्याने भरून ओव्हर फ्लो होतील, अशी भीती स्थानिक नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.

माथेरान या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. त्यामुळे नेरळ-माथेरान घाट रस्त्याच्या बाजूला पाणी जाण्यासाठी गटारे बांधली आहेत. मात्र, या गटारांच्या साफसफाईचे काम अद्याप झालेले



नाही. या रस्तात ज्या ठिकाणी खड्डे होते किंवा धोक्याची वळणे होती अशा ठिकाणी डांबरीकरण करून ते खड्डे बुजविण्यात आले आहेत. परंतु, त्याच रस्त्यामध्ये असणारी गटारे मात्र बांधकाम विभागाला साफ करता आली नाहीत. जर या गटाराची स्वच्छता केली नाही, तर पाणी ओव्हर फ्लो होऊन ते रस्त्यावरून वाहेल. परिणामी नुकतेच केलेले रस्त्याचे डांबरीकरण पुन्हा उखडून जाईल. त्यामुळे बांधकाम खात्याच्या या कारभाराबद्दल टॅक्सी चालकांसह स्थानिक नाराजी व्यक्त करीत आहेत.

# पनवेलमध्ये पावसाळ्यापूर्वीच पंप तैनात

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेने शहरातील सखल भागांमध्ये पाणी उपसण्यासाठी वापरण्यात येणारे हायड्रोलिक व डिझेल पंप आधीच तैनात केले आहेत. महापालिका प्रशासनाने ही पूर्वतयारी असल्याचे सांगितले असले, तरी मागील वर्षांच्या अनुभवामुळे नागरिकांनी या व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

मागील पावसाळ्यात अनेक ठिकाणी पाणी साचल्यानंतर पंप सुरू करण्यासाठी कर्मचारी वेळेवर उपलब्ध नसल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. काही ठिकाणी पंप सुरू होत नव्हते, तर काही ठिकाणी पाणी उपसण्याची क्षमता अपुरी



ठरत होती. परिणामी नागरिकांना तासन्तास पाण्यातून मार्ग काढावा लागला होता. यंदा पावसाच्या आगमनापूर्वीच पंप तैनात करण्यात आले असले, तरी त्यांची प्रत्यक्ष चाचणी घेण्यात आली आहे का, ते पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत का आणि आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध आहे का, असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. तसेच पंप ज्या दिवसापासून जागेवर ठेवले जातात, त्या दिवसापासून त्यांचे भाडे आकारले जात असल्याने करदात्यांच्या पैशांचा योग्य वापर होत आहे का, याबाबतही चर्चा सुरू आहे. दरम्यान, नागरिकांनी महापालिकेकडे महत्त्वाची मागणी केली आहे. ज्या ठिकाणी पंप तैनात करण्यात आले आहेत, त्या ठिकाणी संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांचे मोबाईल क्रमांक दर्शविणारे फलक लावावेत. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना त्वरित संपर्क साधता यावा आणि पंप वेळेत सुरू व्हावेत, यासाठी ही व्यवस्था आवश्यक असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

# ''पेट्रोल संपले आहे''




● (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरुड तालुक्यातील शिघ्रे पेट्रोल पंपावर सोमवारी (दि.८) सायंकाळच्या सुमारास ''पेट्रोल संपला आहे'' अशी पाटी लावण्यात आली होती. मंगळवारी (दि.९) देखील पेट्रोल पंपावर पेट्रोल नसल्याने वाहनचालकांना एका पंपावरून दुसऱ्या पंपावर भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पेट्रोल पंप मालक, संबंधित प्रशासन आणि तेल कंपन्यांनी तातडीने परिस्थितीवर नियंत्रण मिळवून नियमित पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी वाहन चालक करीत आहेत.

## शेतीच्या मशागतीची कामे पुर्ण

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील बळीराजा आपल्या मान्सूनपूर्व शेतीच्या मशागतीची कामे उरकून मोसमी पावसाची आतुरतेने वाटपाहत आहे. मात्र, पाऊस बरसत नसल्यामुळे पेरणीची कामे खोळंबली आहेत. अलीकडे महाराष्ट्रात मान्सून लवकर येण्याची चिन्हे दिसू लागली असली तरी तालुक्यात मोसमी मृग नक्षत्र पावसाच्या सरी काही अजून बरसल्या नाहीत. दरम्यान, येथील खाडी भागातल्या शेतकऱ्यांनी धूळ वाफेवरची पेरणी करून घेतली असून, काही शेतकरी भाताच्या पेरणीला ताबडतोब सुरुवात करणार आहेत.

### सर्वसामान्य रुग्णांचे गंभीर हाल | डॉक्टरांसमोर मोठे संकट

# अनियमित वीजपुरवठ्यामुळे आरोग्यसेवा धोक्यात

**| माणगाव | प्रतिनिधी |**

ग्रामीण आणि आदिवासी भागातील रुग्णांसाठी जीवनदायी ठरणारी आरोग्यसेवा आज अनियमित वीजपुरवठ्यामुळे गंभीर संकटात सापडली आहे. सतत होणाऱ्या पॉवर फ्लक्चुएशन्समुळे महत्त्वाची वैद्यकीय उपकरणे वारंवार बिघडत असून, त्याचा थेट फटका गंभीर रुग्णांच्या उपचारांवर होत आहे. त्यामुळे डॉक्टर आणि रुग्ण दोघांनाही प्रचंड मानसिक, आर्थिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. या गंभीर समस्येकडे माणगाव येथील ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. आबासाहेब पाटणकर यांनी लक्ष वेधले आहे.

माणगाव येथील ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. आबासाहेब पाटणकर यांनी या गंभीर समस्येकडे लक्ष वेधत सांगितले की, पाटणकर हॉस्पिटलमधील अतिदक्षता विभागातील अनेक महत्त्वाची उपकरणे अनियमित वीजपुरवठ्यामुळे बंद पडत आहेत. त्यात व्हेंटिलेटर सध्या बंद अवस्थेत आहे. त्यामुळे गंभीर रुग्णांवर तातडीने उपचार करणे अत्यंत कठीण बनले आहे. विशेषतः आदिवासी व दुर्गम भागातील रुग्ण मोठ्या शहरांतील रुग्णालयांमध्ये जाण्यास टाळाटाळ करतात. आर्थिक परिस्थिती, प्रवासाचा खर्च आणि शहरातील उपचारांचा



> जेव्हा एखाद्या गंभीर रुग्णासाठी आवश्यक उपकरण अचानक बंद पडते, तेव्हा त्याचे परिणाम केवळ आर्थिक नसतात; ते थेट मानवी जीवाशी संबंधित असतात. याची महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात.
>
> - डॉ. आबासाहेब पाटणकर, ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ, माणगाव

वाढता भार यामुळे हे रुग्ण स्थानिक स्तरावरच उपचार घेण्यास प्राधान्य देतात. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील रुग्णालयांमध्ये उपलब्ध असलेली उपकरणे बंद पडल्यास रुग्णांच्या जीवाला थेट धोका निर्माण होतो. काही महिन्यांपूर्वी तब्बल २ लाख रुपये खर्च करून व्हेंटिलेटर दुरुस्त करण्यात आला होता. मात्र, पुन्हा एकदा पॉवर फ्लक्चुएशन्समुळे तो निकामी झाला असून, आता त्याच्या दुरुस्तीसाठी सुमारे ३ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. एवढा मोठा खर्च करणे शक्य नसल्याने हा व्हेंटिलेटर वापरात आणता येत नाही. परिणामी अनेक गंभीर रुग्णांना आवश्यक ती जीवनरक्षक सुविधा मिळत नसल्याचे वास्तव समोर आले आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, वीजपुरवठ्यातील चढ-उतार नियंत्रित करण्यासाठी रुग्णालयात सुमारे १ लाख रुपये खर्च करून उच्च क्षमतेचा स्टॅबिलायझर बसविण्यात आले आहे. मात्र, वीजेतील असामान्य आणि तीव्र चढ-उतारांमुळे हा स्टॅबिलायझर देखील निष्प्रभ ठरत आहे. इतकेच नव्हे तर त्यातील पॉवर सर्किट्सही वारंवार खराब होत असल्याने अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत आहे. त्यांची दुरुस्ती करण्यासाठी शहरातील विशेष केंद्रांमध्ये पाठवावी लागतात. त्यामध्ये मोठा खर्च तर होतोच, शिवाय उपकरणे परत येण्यासाठी बराच कालावधी लागतो. तोपर्यंत रुग्णांना अत्यावश्यक वैद्यकीय सेवा मिळण्यात अडथळे निर्माण होतात. ग्रामीण आणि आदिवासी भागातील हजारो रुग्णांच्या आरोग्याचा प्रश्न आज अनियमित वीजपुरवठ्यामुळे धोक्यात आला असून, संबंधित प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि महावितरण यांनी त्वरित हस्तक्षेप करून या गंभीर समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची गरज व्यक्त होत आहे, असे डॉ. आबासाहेब पाटणकर म्हणाले.

# तरुणाईचे दोन चेहरे

एकाच काळात तरुणाईचे अनेक चेहरे समोर येत आहेत. भारतासारख्या देशामध्ये खेड्यातला, शहरातला, गरीब, श्रीमंत असा तरुण वेगवेगळा असणे साहजिक आहे. त्याच्या आशाआकांक्षा, आवडीनिवडी भिन्न असणे स्वाभाविक आहे. मात्र शहरी वातावरणातल्या, एकाच वर्गातल्या तरुणांचे वेगवेगळे वाटणारे जे चेहरे समोर येतात ते विचार करायला लावणारे आहेत. एकीकडे नीट, जेईई, यूपीएससी यासारख्या स्पर्धात्मक परीक्षांसाठी जीव तोडून मेहनत करणारे, अनेकदा अपयश आले तरीही पुन्हा पुन्हा परीक्षा देणारे युवक दिसतात. परदेशातील शिष्यवृत्यांसाठी झगडणारे विद्यार्थीही यात असतात. पण दुसरीकडे याच वर्गामधून अमली पदार्थांच्या आहारी गेलेले तरुणही मोठ्या प्रमाणात दिसतात. हजारो रुपये तिकिट असलेल्या नाचाच्या वा गाण्याच्या कार्यक्रमांना हजेरी लावण्यासाठी हे गोव्यापासून दूरदूरच्या प्रदेशात जातात आणि तेथे रात्रभर अमली पदार्थांची धुंदीलाच कवटाळतात. पैशांचा, स्वतःच्या आरोग्याचा आणि आयुष्याचाही चुराडा करतात. यातून सावरण्याची संधी मिळाली तर ठीक. अन्यथा, ही आयुष्ये भरकटत जातात. अनेकदा ही मुले गुन्हेगारीकडे वळतात. काही जण अतिसेवनामुळे गंभीर आजारी पडतात वा मृत्यूही पावतात. अशा घटना अलिकडे वारंवार वाढल्या आहेत. गोरेगावच्या नेस्को हॉलमध्ये काही महिन्यांपूर्वी झालेल्या जलशामध्ये दोन जणांचा मृत्यू झाला होता. या जलशामध्ये विशिष्ट अंमली पदार्थ मिळणार असल्याची खबर सोशल मिडियातून पसरवली गेली होती. त्यानुसार मुले व मुली तिथे हजर झाली होती. या अंमली पदार्थांचा पुरवठा करणारा कल्याणचा इसम हा नामचीन अमली पदार्थांचा व्यापारी होता. त्याच्या कुटुंबियांवरही या प्रकारचे आरोप होते. त्यावरून आपल्या आसपासच्या इमारतींमध्ये साधे नोकरदार वाटणारे लोकही कसे यात गुंतलेले असतात हे उघड झाले. हे प्रकरण ताजे असतानाच दोन दिवसांपूर्वी वरळीच्या एका आलिशान डोममधील म्युझिक कॉन्सर्टमध्ये वकिलीचे शिक्षण घेणाऱ्या २८ वर्षीय तरुणाचा मृत्यू ओढवला आहे. हा मृत्यू अमली पदार्थांच्या सेवनामुळे झाला की अति दारू सेवनामुळे हे अजून स्पष्ट झालेले नाही. मात्र ऐन तारुण्यात कोणत्याही व्यसनापायी असा बळी जाणे हे दुर्दैवी आहे.

## पोलिसांची जबाबदारी

रविवारच्याच दिवशी पुण्याच्या तुळापूर परिसरातील फार्महाऊसवर ‘प्रोजेक्ट एक्स’ नावाखाली सुरू असलेल्या अवैध अमली पदार्थ व मद्य पार्टीवर पोलिसांनी छापा टाकून ८५ लाखांचा साठा जप्त केला असून ७८ जणांवर गुन्हा दाखल केला आहे. या दोन्ही घटना वरकरणी स्वतंत्र दिसत असल्या तरी त्यांचा उगम एकाच मानसिकतेतून झाला आहे. ती मानसिकता म्हणजे क्षणिक आनंदाच्या नावाखाली मृत्यूशी खेळणे आणि कायद्याला धाब्यावर बसवून नशेत धुंद होणे. आज आपली तरुण पिढी अशा ‘मृत्यूच्या कन्सर्ट’कडे का आकर्षित होत आहे, याचा एक कुटुंब वा समाज म्हणून विचार करण्याची वेळ आली आहे. या समस्येचा एक पैलू तरुणाईच्या बदलत्या जीवनशैलीशी आणि पालकांच्या मानसिकतेशी जोडलेला आहे. आज ‘स्टेटस सिम्बॉल’ आणि मित्रांचा दबाव यामुळे हाय-प्रोफाइल पार्ट्यांमध्ये जाणे, वेगवेगळ्या प्रकारची महागडी दारू पिणे, अमली पदार्थांचे सेवन करणे ही फॅशन बनत चालली आहे. २८ ते ३० वयोगटातील उच्चशिक्षित तरुण-तरुणी जर या जाळ्यात अडकत असतील, तर कुटुंब व समाज व्यवस्थाच कुठे तरी चुकते आहे, यावर विचार व्हायला हवा. पैसा आणि स्वातंत्र्याचा अतिरेक तरुणांना स्वैराचाराकडे ढकलत आहे. तो लक्षात घेता, केवळ व्यवस्थेला दोष देऊन कुटुंब वा समाज म्हणून आपल्याला जबाबदारी टाळता येणार नाही. यातला आणखी एक मुद्दा हा तरुणांना सहन कराव्या लागणाऱ्या स्पर्धेचा आहे. वर ज्या नीट परिक्षेचा उल्लेख केला तिला २२ लाख विद्यार्थी बसले होते. त्यातून केवळ काही हजार विद्यार्थ्यांना डॉक्टरकीच्या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळतो. इंजिनिअरिंगसाठीही अशीच जीवघेणी स्पर्धा असते. यामध्ये यश मिळाले नाही किंवा हवे ते कॉलेज मिळाले नाही की हा तरुण स्पर्धेमध्ये मागे फेकला जातो. त्यानंतर अधिक कष्ट करून यश मिळवण्याची उमेद तो हरवून बसतो. यातूनच अनेकदा बुध्दिमान तरुणही या व्यसनाकडे ओढले जातात. यामध्ये आपले पोलिस व सरकारची जबाबदारीही दुर्लक्ष करण्यासारखी नाही. आपल्या विभागातील खडान्‌खडा घडामोडींची तपशीलवार माहिती असणाऱ्या पोलिस यंत्रणांच्या नाकाखालीच अशा मद्यधुंद पार्ट्या होत असतील, तर ते गंभीर आहे.

## स्पर्धेतून येणारे नैराश्य

अशा संगीत जलशांची जोरदार जाहिरात सोशल मिडियामधून होत असते. गोवा, पुणे, बंगलोर इत्यादी तरुण नोकरदार, भरपूर पगार मिळवणारे आयटीवाले इत्यादींचा समावेश असलेले इव्हेंट वरचेवर होतात. या ठिकाणी अंमली पदार्थांचे सेवन व व्यापार होण्याच्या भरपूर शक्यता असतात. त्यांच्यावर लक्ष ठेवणे सहज शक्य असते. नव्हे ते पोलिसांचे कर्तव्यच आहे. मुंबईत गोरेगावच्या नेस्कोमधील घटनेनंतर पोलिसांच्या विशेष मार्गदर्शक सूचना जारी झाल्या होत्या. उपायुक्तांवर जबाबदाऱ्याही सोपवल्या गेल्या होत्या. तथापि, तपास यंत्रणेची ही ‘तत्परता’ केवळ कागदावरच राहिली, हेच कालच्या वरळीच्या घटनेवरून दिसून आले आहे. जेव्हा अशा भव्य आंतरराष्ट्रीय स्तरावरील संगीत कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, तेव्हा तिथे हजारो तरुणांची गर्दी होते. अशा ठिकाणी मद्यविक्रीचे परवाने सहज मिळतात. मद्यविक्री आणि एनर्जी ड्रिंक्सच्या नावाखाली तिथे नेमके काय चालते, यावर देखरेख ठेवणारी शासकीय यंत्रणा तैनात असेल तर त्यांना वेळीच कारवाई करण्यावाचून कुणी रोखले होते? गोरेगावच्या घटनेनंतर जर ठोस नियमावली तयार करण्यात आली होती, तर मग वरळीत हजारो तरुणांच्या उपस्थितीत रात्रभर चालणाऱ्या कार्यक्रमात सुरक्षेचे आणि तपासणीचे कोणते नियम पाळले गेले? पुण्याच्या घटनेत तर मद्यविक्रीच्या परवान्याची मुदत संपल्यानंतरही राजरोसपणे पार्टी सुरू होती. तिथे प्रतिबंधित हुक्का आणि गांजाचा मोठा साठा सापडला. याचा साधा सरळ अर्थ हाच की, पोलिसांच्या डोळ्यादेखत, त्यांच्या आशीर्वादाने किंवा त्यांच्या गुप्तचर यंत्रणांच्या अपयशाचा फायदा घेऊनच हा नशेचा काळाबाजार फोफावतो आहे. जेव्हा एखाद्या तरुणाचा जीव जातो, तेव्हा पोलीस केवळ ‘अपघाती मृत्यूची’ नोंद करतात, सीसीटीव्ही फुटेज गोळा करतात आणि रक्ताचे नमुने प्रयोगशाळेत पाठवून आपली पुढील जबाबदारी झटकतात. मुळात ही कारवाई म्हणजे मूळ रोगावर उपचार नसून केवळ लक्षणांवर केलेली तात्पुरती मलमपट्टी आहे. दुसरीकडे, अशा पार्ट्यांचे आयोजन करणारे व्यावसायिक केवळ नफा कमावण्यासाठी तरुणांच्या जिवाशी खेळत आहेत. हे नफेखोर नामानिराळे राहतात किंवा चौकशीच्या फेऱ्यातून सहीसलामत बाहेर पडतात. या संपूर्ण प्रकरणामागचे विदारक सत्य आहे, ते म्हणजे आपले हात वरपर्यंत आहेत, आपले कुणीच वाकडे करू शकत नाही ही मिजास आणि सर्व काही पैशाने विकत घेता येते हा माज आयोजकांना असतो. त्यात तरुण पिढी स्वतःहून त्यांच्या जाळ्यात अडकत चालली आहे. या पिढीला वेळीच सावध करणे, तिचे प्रबोधन करणे याची गरज निर्माण झाली आहे. एकीकडे या देशातील तरुण कॉकरोच पार्टीच्या झेंड्याखाली आंदोलन करायला तयार असल्याचे आश्वासक चित्र दिसते. तर दुसरीकडे त्याच वर्गातील तरुण अशा अमली पदार्थांच्या जाळ्यात सापडतो हे विदारक आहे.

---

**विचार**

# भारताचे नवे स्टील धोरण

*रेल्वेपासून महामार्ग, बंदरे, मेट्रो, संरक्षण, ऊर्जा, वाहन उद्योग, गृहनिर्माण आणि पायाभूत सुविधा या सर्व क्षेत्रांची उभारणी स्टीलशिवाय शक्य नाही. सरकार नवे राष्ट्रीय स्टील धोरण तयार करत असून त्यामध्ये हरित स्टील, प्रीमियम स्टील आणि स्पेशालिटी स्टील उत्पादनाला प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला जात आहे. हे धोरण केवळ औद्योगिक दस्तावेज नसून भारताच्या भावी आर्थिक आणि पर्यावरणीय दिशेचे संकेत देणारे आहे.*



प्रा. सुखदेव बखळे

भारतातील औद्योगिक विकासाच्या इतिहासात स्टील उद्योगाला नेहमीच कणा मानले गेले आहे. रेल्वेपासून महामार्ग, बंदरे, मेट्रो, संरक्षण, ऊर्जा, वाहन उद्योग, गृहनिर्माण आणि पायाभूत सुविधा या सर्व क्षेत्रांची उभारणी स्टीलशिवाय शक्य नाही. म्हणूनच एखाद्या देशाच्या औद्योगिक शक्तीचे मोजमाप त्याच्या स्टील उत्पादन क्षमतेवरून केले जाते. भारत आज जगातील दुसऱ्या क्रमांकाचा स्टील उत्पादक देश असला, तरी बदलत्या जागतिक आर्थिक आणि पर्यावरणीय वास्तवामुळे आता केवळ उत्पादनवाढ पुरेशी राहिलेली नाही. उत्पादनाबरोबरच गुणवत्ता, तंत्रज्ञान, ऊर्जा कार्यक्षमता आणि कार्बन उत्सर्जन कमी करणे हीदेखील तितकीच महत्त्वाची उद्दिष्टे ठरत आहेत. गेल्या काही दशकांमध्ये भारताने स्टील उत्पादनात मोठी झेप घेतली. २००५ नंतर पायाभूत सुविधांवरील गुंतवणूक वाढली, शहरीकरणाचा वेग वाढला आणि वाहन उद्योगाचा विस्तार झाला. परिणामी स्टीलची मागणी सातत्याने वाढत गेली; मात्र भारतीय स्टील उद्योगाचा मोठा भाग अजूनही पारंपरिक कोळसा-आधारित ब्लास्ट फर्नेस पद्धतीवर अवलंबून आहे. ही पद्धत उत्पादनक्षम असली, तरी ती मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साइड उत्सर्जित करते. जगभरात हवामानबदलाचा प्रश्न गंभीर बनत असताना स्टील उद्योग हा सर्वाधिक प्रदूषण करणाऱ्या उद्योगांपैकी एक मानला जातो. जागतिक कार्बन उत्सर्जनात स्टील क्षेत्राचा सुमारे सात ते आठ टक्के वाटा असल्याचे विविध अभ्यासांमधून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आता जगातील प्रमुख अर्थव्यवस्था हरित स्टील उत्पादनाकडे वळत आहेत.

युरोपीय महासंघाने कार्बन बॉर्डर ॲडजस्टमेंट मेकॅनिझमसारखे नियम लागू करण्यास सुरुवात केली आहे. यानुसार जास्त कार्बन उत्सर्जन करून तयार झालेल्या उत्पादनांवर अतिरिक्त कर लावला जाणार आहे. याचा थेट परिणाम भारतीय स्टील निर्यातीवर होऊ शकतो. भारताने वेळेत हरित उत्पादन पद्धती न स्वीकारल्यास जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मकता कमी होण्याचा धोका निर्माण होईल. त्यामुळे नव्या स्टील धोरणामागे केवळ पर्यावरणीय बांधिलकी नाही, तर आर्थिक स्वार्थही दडला आहे. सरकार २०३५ पर्यंत भारताची स्टील उत्पादन क्षमता सुमारे ४०० दशलक्ष टनांपर्यंत नेण्याचा विचार करत आहे; परंतु या विस्ताराचा केंद्रबिंदू केवळ प्रमाण नसून गुणवत्ता असेल. आतापर्यंत भारतात मोठ्या प्रमाणावर सामान्य दर्जाचे बांधकाम स्टील तयार होत होते; परंतु उच्च तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांसाठी आवश्यक असलेले स्पेशॅलिटी स्टील आणि प्रीमियम स्टील मोठ्या प्रमाणावर आयात करावे लागत होते. संरक्षण, सेमीकंडक्टर उपकरणे, इलेक्ट्रिक वाहने, अक्षय ऊर्जा प्रकल्प आणि आधुनिक अभियांत्रिकी उद्योगांना उच्च दर्जाच्या स्टीलची आवश्यकता असते. या क्षेत्रांमध्ये आत्मनिर्भरता साधायची असेल, तर देशांतर्गत प्रीमियम स्टील उत्पादन वाढवणे अपरिहार्य ठरणार आहे.

नव्या धोरणात हरित स्टील उत्पादनाला विशेष महत्त्व दिले जात आहे. हरित स्टील म्हणजे कमी कार्बन उत्सर्जन करून तयार केलेले स्टील. यासाठी पारंपरिक कोळशाऐवजी हरित हायड्रोजन, अक्षय ऊर्जा, स्क्रॅप-आधारित इलेक्ट्रिक आर्क फर्नेस किंवा कार्बन कॅप्चर तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. भारतासाठी हे संक्रमण सोपे नाही. कारण देशातील मोठ्या स्टील कंपन्यांनी कोळसा-आधारित प्रकल्पांमध्ये हजारो कोटींची गुंतवणूक केलेली आहे. त्यात त्वरित बदल करणे आर्थिकदृष्ट्या कठीण आहे. शिवाय हरित हायड्रोजनची किंमत अजूनही जास्त आहे. अक्षय ऊर्जेची उपलब्धता, तांत्रिक कौशल्य आणि पुरवठा साखळी यांसारखी अनेक आव्हाने समोर आहेत, तरीदेखील भारताकडे काही मोठ्या संधी आहेत. देशात सौर आणि पवन ऊर्जेची क्षमता मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. ‘हरित हायड्रोजन मिशन’द्वारे सरकार स्वच्छ इंधन उत्पादनाला प्रोत्साहन देत आहे. जर स्टील उद्योगाने या ऊर्जास्रोतांचा प्रभावी वापर केला, तर भारत कमी खर्चात हरित स्टील तयार करणाऱ्या प्रमुख देशांमध्ये स्थान मिळवू शकतो. विशेष म्हणजे विकसित देशांमध्ये ऊर्जा खर्च वाढत असताना भारताला उत्पादन खर्चात स्पर्धात्मक फायदा मिळण्याची शक्यता आहे. सरकार सार्वजनिक खरेदीत ‘हरित स्टील’चा अनिवार्य वापर करण्याचाही विचार करत आहे. महामार्ग, रेल्वे, सरकारी इमारती, मेट्रो आणि ऊर्जा प्रकल्पांमध्ये हरित स्टील वापरले गेले, तर त्यासाठी मोठी बाजारपेठ तयार होऊ शकते. सुरुवातीला ‘हरित स्टील’चे उत्पादन महाग असले, तरी मोठ्या प्रमाणातील मागणीमुळे खर्च कमी होण्यास मदत होईल. हा दृष्टिकोन ऊर्जा संक्रमणाच्या इतर क्षेत्रांमध्येही यशस्वी ठरला आहे. उदाहरणार्थ, सौर ऊर्जेच्या बाबतीत सुरुवातीला सरकारी प्रोत्साहनामुळेच उद्योगाला चालना मिळाली होती. नव्या धोरणातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आयात कमी करून देशांतर्गत उत्पादनाला चालना देणे. भारत अजूनही काही प्रकारच्या उच्च दर्जाच्या स्टीलसाठी चीन, जपान आणि दक्षिण कोरियावर अवलंबून आहे. जागतिक पुरवठा साखळीतील अस्थिरता आणि भूराजकीय तणाव लक्षात घेता हे अवलंबित्व धोकादायक ठरू शकते. कोविड महामारीनंतर जगभरातील देशांनी धोरणात्मक उद्योगांमध्ये स्वावलंबनावर भर देण्यास सुरुवात केली आहे. स्टील क्षेत्रही त्याला अपवाद नाही; मात्र या सर्व योजनांच्या यशासाठी काही मूलभूत प्रश्न सोडवावे लागतील. भारतातील अनेक लघु आणि मध्यम स्टील उत्पादक अजूनही जुन्या तंत्रज्ञानावर चालतात. त्यांच्याकडे हरित तंत्रज्ञानात गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक भांडवल नाही. धोरण केवळ मोठ्या उद्योगसमूहांपुरते मर्यादित राहिले, तर लहान उद्योग अडचणीत येऊ शकतात. त्यामुळे सरकारने आर्थिक सहाय्य, करसवलती, तांत्रिक मदत आणि स्वस्त वित्तपुरवठा यांसारख्या उपाययोजना करणे आवश्यक आहे.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कच्चा माल. भारताकडे लोखंड, खनिजाचा मोठा साठा असला, तरी उच्च दर्जाच्या कोकिंग कोळशासाठी मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागते. हरित स्टीलकडे संक्रमण करताना स्क्रॅप पुनर्वापर उद्योग विकसित करणे आवश्यक ठरेल. सध्या भारतातील स्क्रॅप संकलन आणि प्रकिया व्यवस्था विस्कळीत आहे. भविष्यात परिपत्र अर्थव्यवस्थेचा भाग म्हणून स्क्रॅप-आधारित उत्पादन वाढवणे अत्यंत महत्त्वाचे ठरेल. मानवी संसाधनांचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. हरित स्टील उद्योगासाठी नव्या प्रकारच्या तांत्रिक कौशल्यांची गरज भासणार आहे. अभियंते, ऊर्जा तज्ज्ञ, हायड्रोजन तंत्रज्ञानातील प्रशिक्षित मनुष्यबळ आणि डिजिटल ऑटोमेशन तज्ज्ञ यांची मोठी मागणी निर्माण होईल. त्यामुळे कौशल्य विकास कार्यक्रमांना नव्या धोरणाशी जोडणे आवश्यक ठरेल. या धोरणाचा आणखी एक व्यापक परिणाम म्हणजे भारताच्या हवामान धोरणावर निर्माण होणारा प्रभाव. भारताने २०७० पर्यंत नेट-झिरो उत्सर्जनाचे लक्ष्य जाहीर केले आहे. हे लक्ष्य साध्य करायचे असेल तर ऊर्जा, वाहतूक आणि उद्योगक्षेत्रात मोठे बदल करावे लागतील. त्यात स्टील उद्योगाचे योगदान निर्णायक असेल. भारताने स्टील क्षेत्रातील उत्सर्जन लक्षणीयरीत्या कमी केल्यास जागतिक हवामान चर्चांमध्ये देशाची विश्वासार्हता वाढेल. तथापि, केवळ धोरण जाहीर करून उद्दिष्टे साध्य होत नाहीत. भारतात अनेक क्षेत्रांमध्ये धोरण आणि अंमलबजावणी यांच्यात मोठी दरी दिसून येते. हरित स्टीलच्या बाबतीतही अशीच परिस्थिती उद्‌भवू नये, यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये समन्वय आवश्यक असेल.

पर्यावरण मंजुरी, ऊर्जा उपलब्धता, जमीन अधिग्रहण, संशोधन आणि विकास, वित्तपुरवठा आणि निर्यात धोरण या सर्व बाबींमध्ये सुसंगत दृष्टिकोन आवश्यक आहे. भारतातील मोठ्या स्टील कंपन्यांनी आधीच हरित तंत्रज्ञानात गुंतवणूक सुरू केली आहे. काही कंपन्या हायड्रोजन-आधारित उत्पादनाचे प्रयोग करत आहेत, तर काही कार्बन कॅप्चर आणि पुनर्वापर तंत्रज्ञानावर काम करत आहेत; परंतु जागतिक स्तरावर स्पर्धा करायची असेल, तर संशोधन आणि नवकल्पनांमध्ये आणखी मोठी गुंतवणूक करावी लागेल. भारताने केवळ तंत्रज्ञान आयात करणारा देश न राहता तंत्रज्ञान विकसित करणारा देश बनणे गरजेचे आहे. नवे राष्ट्रीय स्टील धोरण हे भारताच्या औद्योगिक परिवर्तनातील महत्त्वाचे पाऊल ठरू शकते. हे धोरण योग्य पद्धतीने राबवले गेल्यास भारताला केवळ उत्पादनवाढ नाही तर उच्च दर्जाचे, पर्यावरणपूरक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक औद्योगिक राष्ट्र म्हणून उभे राहण्याची संधी मिळू शकते; मात्र त्यासाठी दीर्घकालीन दृष्टी, सातत्यपूर्ण गुंतवणूक आणि उद्योग-सरकार यांच्यात प्रभावी सहकार्य आवश्यक असेल. एके काळी औद्योगिक क्रांतीचे प्रतीक असलेले स्टील आता हरित अर्थव्यवस्थेच्या नव्या युगात प्रवेश करत आहे. भारताने या संक्रमणात पुढाकार घेतला, तर ते आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरेलच, पण भविष्यातील पिढ्यांसाठी अधिक शाश्वत विकासाचा मार्गही खुला करेल.

---

**चर्चा आजची**

# बळीराजावर अस्मानी... अन् सुलतानीही!

राकेश लोहार

मागील काही दिवसांपासून मान्सूनपूर्व पावसाच्या हलक्या सरी सर्वदूर कोसळत असल्याने बळीराजाने खरीपाच्या पेरणीला सुरुवात केली. काही ठिकाणी पेरलेल्या भाताला कोंबही फुटले आहेत. मात्र, पावसाने अचानक दडी मारल्याने आलेले कोवळे कोंब कडक उन्हात करपून जाण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत सापडला आहे. त्यातच १५ जूनपर्यंत समाधानकारक पावसाची शक्यता नसल्याचा अंदाज राज्य सरकारकडून व्यक्त झाल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत आणखी भर पडली आहे.

महागडी बियाणे, मशागत, मजुरी आणि इतर खर्च करून शेतकऱ्याने पेरणी केली. परंतु निसर्गाने पाठ फिरवली तर या सर्व खर्चावर पाणी फिरण्याची वेळ येते. पेरलेले बी उगवले नाही तर आर्थिक नुकसान तर होतेच; पण पुन्हा पेरणी करण्यासाठी लागणारा खर्च उभा करण्याचे मोठे संकट शेतकऱ्यांसमोर उभे राहते. शेती हा व्यवसाय नसून, जुगार बनत चालल्याची भावना ग्रामीण भागात वाढताना दिसत आहे.

पूर्वी शेतीचे गणित तुलनेने निश्चित होते. पावसाळा कधी सुरू होईल, किती पाऊस पडेल, कोणत्या काळात लागवड करायची याचा अनुभवाच्या आधारे अंदाज बांधता येत होता. आज मात्र हवामानातील बदलांनी ही सर्व गणिते मोडून काढली आहेत. एकीकडे हवामान खात्याचे अंदाज, तर दुसरीकडे प्रत्यक्ष परिस्थिती यामध्ये अनेकदा मोठी तफावत दिसून येते. परिणामी, शेतकरी संभ्रमावस्थेत अडकतो. पेरणी करावी की थांबावे, याच निर्णयात त्याचा अमूल्य वेळ आणि पैसा खर्ची पडतो.

हवामानातील अनिश्चितता ही आता अपवाद राहिलेली नाही; तीच नवी वास्तवता बनली आहे. कधी अवकाळी पाऊस, कधी ढगफुटी, कधी गारपीट, तर कधी दीर्घकालीन दुष्काळ अशा टोकाच्या परिस्थितींमध्ये शेतकरी अक्षरशः भरडला जात आहे. एका वर्षी अतिवृष्टी पिके वाहून नेते, तर दुसऱ्या वर्षी पाऊसच गायब होतो. निसर्गाच्या या दुष्टचक्रात सर्वाधिक भरडला जाणारा घटक म्हणजे अन्नदाता शेतकरी.

गतवर्षीही असाच अनुभव शेतकऱ्यांनी घेतला. मे महिन्यापासूनच पाऊस सुरू झाल्याने अनेकांनी घाईघाईत पेरणी केली. मात्र, जमिनीतील ऊब कमी झाल्याने मोठ्या प्रमाणात भाताचे पीक वाया गेले. बियाणे अर्धेअधिक कुजून वाया गेल्याने अनेक शेतकऱ्यांना शेती ओसाड ठेवावी लागली. यंदा उलट परिस्थिती निर्माण झाली आहे. सुरुवातीला तुरळक का होईना पाऊस पडला, त्यामुळे आशेचा किरण दिसला; पण आता उन्हाच्या झळा वाढल्याने पुन्हा चिंता वाढली आहे. म्हणजेच, कोणत्याही परिस्थितीत नुकसान मात्र शेतकऱ्याचेच.

शेती उत्पादनाचा खर्च सातत्याने वाढत आहे. बियाणे, खते, औषधे, मजुरी, ट्रॅक्टरची मशागत, इंधन, वीजबिले अशा प्रत्येक घटकाचा खर्च वाढला आहे. परंतु, उत्पन्न मात्र त्याच प्रमाणात वाढलेले नाही. पीक चांगले आले तरी बाजारात भाव मिळेल याची खात्री नसते. व्यापाऱ्यांच्या दयेवर भाव ठरतात, तर शासकीय खरेदी व्यवस्थेच्या मर्यादा वेगळ्याच. त्यामुळे शेतकऱ्याच्या मेहनतीचे मोल अनेकदा त्यालाच मिळत नाही.

विशेष म्हणजे, शेतीचे नुकसान झाले की त्याची झळ फक्त शेतकऱ्यालाच बसते असे नाही. त्याचा परिणाम संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतो. मजुरांना रोजगार कमी मिळतो, खत-बियाणे विक्रेत्यांची उलाढाल घटते, बाजारपेठेतील खरेदी कमी होते आणि शेतकऱ्याचे आर्थिक चक्र मंदावते. त्यामुळे शेतकऱ्याचे संकट हे केवळ एका व्यक्तीचे संकट नसून, संपूर्ण समाजव्यवस्थेचे संकट आहे.

हवामान बदल हा आता केवळ पर्यावरणाचा विषय राहिलेला नाही, तर तो थेट शेती आणि अन्नसुरक्षेशी निगडित प्रश्न बनला आहे. पावसाचे चक्र पूर्णपणे विस्कळीत होत आहे. पूर्वी ठरावीक काळात पडणारा पाऊस आता अनियमित झाला आहे. शेतकऱ्यांच्या पिढ्यान्‌पिढ्यांच्या अनुभवावर आधारित नियोजनाचे गणित कोलमडून पडत आहे. आज कोणती पिके घ्यावीत, पेरणी कधी करावी, लागवड कधी करावी, याचा अंदाज बांधणेही अवघड झाले आहे.

दुसरीकडे शेती क्षेत्रावर वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि विकास प्रकल्पांचेही मोठे दडपण आहे. शेतीयोग्य जमीन कमी होत चालली आहे. पाण्याचे स्रोत आटत आहेत. जंगलांचे क्षेत्र कमी होत असल्याने स्थानिक हवामानावरही परिणाम होत आहे. या सर्वांचा एकत्रित परिणाम शेतीवर होत असून, बळीराजा चारही बाजूंनी कोंडीत सापडला आहे.

अशा परिस्थितीत केवळ शेतकऱ्याला संयमाचा सल्ला देऊन चालणार नाही. हवामान बदलाच्या संकटाशी सामना करण्यासाठी ठोस कृषी धोरण, प्रभावी पीकविमा, वेळेवर नुकसानभरपाई, जलसंधारणाची व्यापक कामे, सिंचन सुविधांचा विस्तार आणि शाश्वत शेतीला चालना देणारे उपाय तातडीने राबविण्याची गरज आहे. अन्यथा प्रत्येक हंगामात शेतकरी निसर्गाच्या दयेवर जगत राहील. आज परिस्थिती अशी झाली आहे की, शेतकरी पाऊस पडला तरी घाबरतो आणि पडला नाही तरी घाबरतो. अतिवृष्टीने पीक जाईल की दुष्काळाने करपेल, या दोन टोकांच्या भीतीमध्ये त्याचे आयुष्य अडकून पडले आहे. आभाळाकडे नजर लावून बसलेला शेतकरी केवळ पावसाची वाट पाहत नाही, तर आपल्या कुटुंबाच्या उद्याची, मुलांच्या शिक्षणाची, कर्जफेडीची आणि जगण्याच्या आशेची वाट पाहत असतो.

देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून ओळखला जाणारा शेतकरी आज स्वतःच्या अस्तित्वासाठी झगडत आहे. शहरातील माणसाच्या ताटात अन्न पोहोचवणारा हात आज आभाळाकडे आशेने पाहत उभा आहे. कधी पावसासाठी प्रार्थना, तर कधी पाऊस थांबावा म्हणून विनवणी हीच त्याची शोकांतिका बनली आहे.

निसर्गाच्या लहरीपणाला शेतकरी जबाबदार नाही; पण त्याची सर्वात मोठी किंमत मात्र त्यालाच चुकवावी लागत आहे. म्हणूनच बळीराजाच्या वेदना समजून घेण्याची आणि त्याला केवळ सहानुभूती नव्हे तर, सक्षम आधार देण्याची हीच योग्य वेळ आहे. अन्यथा अन्नदात्याची ही फरफट उद्या केवळ शेतीपुरती मर्यादित राहणार नाही, तर देशाच्या अन्नसुरक्षेवर आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही त्याचे गंभीर परिणाम दिसून येतील. बळीराजा टिकला तरच शेती टिकेल आणि शेती टिकली तरच देशाचा विकास टिकून राहील.

---

**लोकसंसद**

## नवीन नियमांमुळे भारताच्या सौर ऊर्जा निर्मितीत तात्पुरती घट

केंद्र सरकारने १ जून २०२६ नंतर सुरू होणाऱ्या सर्व सरकारी सौर ऊर्जा प्रकल्पांना, सबसिडी मिळणाऱ्या योजनांना, नेट-मीटरिंग आणि ओपन ॲक्सेस अंतर्गत येणाऱ्या सौर प्रकल्पांना ‘मॉडेल्स आणि उत्पादकांच्या मंजूर यादी’नुसार (एएलएमएम-२) केवळ देशांतर्गत सौर घट वापराचे नियम लागू केले आहेत. या नवीन नियमांमुळे भारताच्या सौर ऊर्जा निर्मितीत तात्पुरती घट किंवा सौर ऊर्जा प्रकल्पांना विलंब होऊ शकतो अशी सार्थ भीती सौर ऊर्जा उद्योग क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे. सौर ऊर्जा निर्मितीत तात्पुरती घट किंवा अडथळे येण्याची शक्यता असली तरी या नियमांचा मुख्य उद्देश भारताला सौर ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर बनवणे हा आहे. त्याचबरोबर चीनवरील आयात अवलंबित्व कमी करणे, देशांतर्गत उत्पादनाला चालना देणे आणि भारतात दर्जेदार आणि खात्रीशीर सौर उपकरणांची निर्मिती करणे ही उद्दिष्टे आहेत. देशातील एकूण ’स्वच्छ आणि अपारंपरिक ऊर्जेचा’ विचार केल्यास त्यात सौर ऊर्जा हा सर्वात मोठा स्त्रोत असून भारताच्या सर्व स्त्रोत मिळून एकूण वीज निर्मिती क्षमतेच्या म्हणजे सुमारे ५२०.५ गिगावॉट वीज निर्मितीमध्ये एकट्या सौर ऊर्जेचा वाटा सुमारे २८.२ टक्के इतका आहे. भारतात सौर ऊर्जेची एकूण स्थापित क्षमता (इन्स्टॉल्ड कॅपॅसिटी) १५० गिगावॉट म्हणजेच १,५०,००० मेगावॉटच्या पर्यंत पोहोचली आहे. नुकत्याच संपलेल्या २०२५-२६ या आर्थिक वर्षात भारताने विक्रमी सौर ऊर्जा क्षमता वाढवून चीन आणि अमेरिकेनंतर जगातील तिसरा सर्वात मोठा सौर ऊर्जा उत्पादक देश बनण्याचा बहुमान मिळवला आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे**

---

**दिनविशेष**

# जागतिक नेत्रदान दिन



आज १० जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. अनेक अंध व्यक्तींचे जीवन प्रकाशमान करणारे सुप्रसिद्ध नेत्र विशारद डॉ. रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० जून हा दिवस जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. डोळ्यात दाटलेल्या काळ्याकुट्ट अंधारातून उद्याच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या व्यक्तींना नेत्रदानाच्या माध्यमातून हे जग सुंदर आहे याची प्रचिती देण्याची प्रेरणा हा दिवस आहे. शासकीय सेवेत नेत्रचिकित्सक म्हणून अहोरात्र झटणाऱ्या डॉ भालचंद्र यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे. त्यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यात १० जून १९२४ रोजी झाला. घरची परिस्थिती हलाखीची असूनही जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी शिक्षण पूर्ण करून नेत्र विशारद पदवी मिळवून ८० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या. १० जून १९७९ ला त्यांचे निधन झाले. या दिवसाचे औचित्य साधून लोकांमध्ये नेत्रदानाविषयी जनजागृती करून लोकांना मृत्यूनंतर डोळे दान करण्यास प्रवृत्त करणे हे या दिवसाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. आपल्या आयुष्यात डोळ्यांचे किती महत्व आहे हे आपण जाणतोच. जगातील सर्व सुंदर गोष्टी आणि सुंदर जगाचा आनंद आपण डोळ्यांमुळेच घेऊ शकतो. डोळ्यांशीवाय जगण्याची कल्पनाही कोणी करू शकत नाही. डोळे हे आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचे ज्ञानेंद्रिय आहे. डोळ्यांद्वारे आपल्याला ७५ टक्के ज्ञान मिळते. सध्याचा काळात बदलणारी जीवनशैली, अनियमित दिनचर्या, प्रदूषण आणि वाढलेला मानसिक तणाव यामुळे बहुतेक लोकांना डोळ्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. काहींना हा त्रास लहानवयातच होतो तर काहींना वयाच्या मध्यकाळात होतो. काही असेही दुर्दैवी असतात की ज्यांच्या आयुष्यात कायमचा अंधार असतो. त्यांना दृष्टीच नसते. जन्मतःच ते दृष्टिहीन असतात. तर काही जण अपघातात आपले डोळे गमावतात. जगभरात दृष्टिहीन लोकांची संख्या जास्त आहे. अशा अंधारलेल्या लोकांच्या आयुष्यात नेत्रदानाने प्रकाश आणता येतो. त्यासाठी नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊन जग न पाहिलेल्या व्यक्तींना नेत्रदान करुन त्यांना हे सुंदर जग पाहण्याची संधी देणे ही काळाची गरज आहे. भारतामध्ये असलेल्या कायद्यानुसार नेत्रदान हे मरणोत्तर करावे. हे नेत्रदान चष्मा असणारे, मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेले तसेच मधुमेह आणि मानसिक त्रास असलेले व्यक्तीही करू शकतात. नेत्रदान करण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींनी जवळच्या नेत्रपेढीत जाऊन नेत्रदानाची नोंद करावी. मृत व्यक्तीने नेत्रदानाची नोंद केली नसली तरी त्या व्यक्तीच्या वारसदारांनी इच्छा व्यक्त केली तरी त्या व्यक्तीचे नेत्रदान होऊ शकते. मृत्यूनंतर जास्तीतजास्त सहा तासाच्या आत नेत्रदान होऊ शकते. ज्या व्यक्तीला नेत्रदानासाठी कॉर्नियाचा वापर करायचा आहे त्याला चोवीस तासाच्या आत कॉर्नियाचे प्रत्यारोपण करणे गरजेचे असते. नेत्रदानाचा अर्थ शरीरातून संपूर्ण डोळा काढून घेणे असा होत नाही. यात मृत व्यक्तीच्या डोळ्याचा कॉर्नियाचा वापर करण्यात येतो. एका मृत्यू झालेल्या व्यक्तीचे डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येते त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे जीवन तर प्रकाशमान होतेच पण मृत व्यक्ती मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहू शकते. आज जागतिक नेत्रदानाच्या दिवशी नेत्रदानाचा संकल्प करूया, मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहूया.

**– श्याम ठाणेदार**

# उरणकरांवर पाणीकपातीचे संकट

## • रानसई धरणातील पाणीसाठा ८४ फुटांवर

| चिरनेर | प्रतिनिधी |

मान्सूनचा पाऊस यंदा लांबण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे उरणकरांच्या चिंतेत वाढ होऊ लागली आहे. दरम्यान रानसई धरणाने मृत साठ्याची पातळी गाठली असून, पुढील काळात या साठ्यातून पाणीपुरवठा केला जाणार असल्याची माहिती एमआयडीसीने दिली आहे. त्यामुळे उरण शहरात सुरू असलेल्या पाणी कपातीत वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मे महिन्यातील वाढत्या तापमानामुळे येथील रानसई धरणातील पाणीसाठा कमी होऊ लागला आहे. त्यामुळे धरणातील हे पाणी जून अखेरपर्यंत पुरविण्याचा प्रयत्न एमआयडीसी करत आहे. मात्र यासाठी नागरिकांनाही या काळात पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन करण्यात येत आहे. गेली अनेक वर्ष



रानसई धरणातील पाणी साठवणूक क्षमता वाढत नसल्याने उरणच्या नागरिकांवर पाणीकपातीचे संकट वाढू लागले आहे.

### 'या' दोन उपाय योजनांची मागणी

शहराला ४१ दशलक्ष लिटर पाण्याची आवश्यकता आहे. मात्र एमआयडीसीकडे केवळ ३० दशलक्ष लीटर पाणी असल्याने दररोज दहा दशलक्ष लिटर पाणी कमी पडते. जून महिन्यापर्यंत धरणातून पाणीसाठा करता यावा, यासाठी दरवर्षी पाणी कपात केली जाते. गेल्या ६० वर्षात धरणातील पाण्याची मागणी वाढली असली तरी त्यांचे धरणातील पाणीसाठा कमी होत गेला. त्यामुळे धरणाची उंची वाढवावी किंवा गाळ काढावा, या दोन उपाय योजनांची मागणी नागरिक वारंवार करत आहेत.

### साठवण क्षमता वाढविण्याची गरज

रानसई धरणातील पाणी साठवण क्षमता गेली अनेक वर्षे वाढत नसल्याने उरणच्या नागरिकांवर पाणीकपातीचे संकट वाढू लागले आहे. धरणाची पाणी साठवण क्षमता कमी झाल्याने या धरणातून पावसाळ्यातील साडेतीन महिन्यांचे लाखो लिटर पाणी वाया जाते. त्यामुळे येथील नागरिकांना ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यापासूनच पाणीकपातीचा सामना करावा लागतो. धरणाची पाणी साठवण क्षमता वाढविण्यासाठी एमआयडीसीने तयार केलेला प्रस्ताव अनेक वर्षे धूळ खात आहे. प्रशासनाने याबाबत ठोस पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे.

दरम्यान रानसई धरणातील पाणीसाठा ८४ फुटांवर आला आहे. ही पातळी मृत पाणी साठ्याची आहे. मान्सून लांबला तरी उरणकरांना नियमित पाणीपुरवठा होणार आहे. त्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. मात्र या कालावधीत नागरिकांनी सहकार्य करून पाणी जपून वापरावे, असे आवाहन उरणच्या एमआयडीसीचे उपअभियंता ज्ञानदेव सोनवणे यांनी केले आहे.

---

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१० जून

१)श्री. मुकुंद रामचंद्र जोशी मु.बुरूमखाण अलिबाग, १०-६-१९४८

२) श्रीम.जान्हवी जीवन केळकर बाजारपेठ,अलिबाग, १०-६-१९४८

३) श्रीम.वंदना वसंत सिंगासाने चेंढरे,अलिबाग, १०-६-१९४८

४) श्री. कमलाकर वसंत मगर वेश्वी,अलिबाग, १०-६-१९५६

५) अतुल विष्णू तुपे ठिकरूळ नाका, अलिबाग, १०-६-१९६४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



कै. रमेश शंकर कदम, स्मरणार्थ अलिबाग



अंजना रमेश जैन, १ ली पुण्यतिथी, अलिबाग



हरी ओम महिला भजन मंडळ, अलिबाग

---

## • मनसेचे सिडकोच्या आरोग्य विभागाला पत्र

# द्रोणागिरीत रस्त्यावर कचरा

| चिरनेर | प्रतिनिधी |

सिडकोच्या स्मार्ट सिटीच्या द्रोणागिरीच्या कोस्टल रोडवर कचऱ्याचे जागोजागी ढीग लागले असून, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रायगड जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर यांनी सिडकोच्या आरोग्य विभागाला पत्रव्यवहार केला आहे. द्रोणागिरी नोडमधील सेक्टर ४८ व ४२ च्या कोस्टल रोडला लागून अनधिकृत कचरा डम्पिंग झोन सुरू असल्याचा ठपका ठेवत, मनसेने ४ जून रोजी सिडको आरोग्य अधिकाऱ्यांना कान उघडणी करणारे पत्र दिले.



या निवेदनात, द्रोणागिरी नोड हा सिडकोचा आदर्श वसाहत प्रकल्प असला तरी कोस्टल रोडच्या बाजूला कचऱ्याचे अनधिकृत स्मारक उभे राहिले आहे. बाहेरून येणारी वाहने शासकीय नियमांना हरताल फासून रात्रीच्या अंधारात कचरा टाकून जातात. मात्र स्थानिक नागरिकांना या कचऱ्याच्या दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. डेंग्यू व मलेरियाच्या डासांनी तर इथे कायमस्वरूपी वास्तव्य केली असल्याची निवेदनातून मनसेने बोचरी टीका केली आहे. कचऱ्यावर जनावरे रस्त्यावर येत असल्याने येथे अपघात होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. स्वच्छ भारत अभियान फक्त कागदावर राबवायचे का? आता दंडात्मक कारवाई अभियान राबवा, असा सल्लादेखील मनसेने दिला आहे.

# व्यापाऱ्याची वीस लाखांची फसवणूक

| पालघर | प्रतिनिधी |

सरकीचे तेल खरेदी करून देण्याच्या बहाण्याने एका स्थानिक व्यापाऱ्याची २० लाख ३६ हजार ५२६ रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार मिरा रोड येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी मिरा रोड पोलीस ठाण्यात आरोपी कय्युम शेख याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, मिरारोड पुर्वेच्या कणकिया परिसरात राहणारे आशिषकुमार सिंग (४२) यांना आरोपी कय्युम शेख (४०) याने स्वस्तात सरकीचे तेल खरेदी करून देण्याचे आमिष दाखवले होते. विश्वास संपादन करण्यासाठी आरोपीने फिर्यादी यांच्याकडे काम करणाऱ्या अमित दुबे यांना बीड येथील शिवांश इंडस्ट्रीजमध्ये नेले. तिथे त्यांच्यासमक्ष टँकरमध्ये तेल भरून ते डिलिव्हरीसाठी तयार असल्याचे दाखवण्यात आले. आरोपी कय्युम शेख याने आशिषकुमार यांच्याकडून वेळोवेळी एकूण २० लाख ३६ हजार ५२६ रुपये स्वीकारले. मात्र, पैसे घेऊनही तेलाची डिलिव्हरी न देता आणि रक्कमही परत न करता त्यांचा विश्वासघात करून आरोपीने ही फसवणूक केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर सिंग यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

---

# जय भवानी पतसंस्थेचा वर्धापन दिन

**अलिबाग :** अलिबाग येथील जय भवानी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित या संस्थेचा ३४वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यास अलिबागचे माजी नगराध्यक्ष व विद्यमान बांधकाम समिती सभापती प्रशांत नाईक यांनी विशेष उपस्थिती दर्शवली. त्यांच्यासह शैलेश चव्हाण, जी. टी. पाटील, योगेश मगर, प्रमोद पाटील व सुरेश पाटील हे मान्यवरही यावेळी उपस्थित होते. या सर्व मान्यवरांनी संस्थेच्या ३४ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचे कौतुक करत पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी ॲड. मिलिंद चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, 'आज पतसंस्थेच्या प्रवासातील ३४ वर्षांचा टप्पा आपण गाठला आहे. या प्रदीर्घ प्रवासात सभासदांचे हित आणि विश्वास हेच आमचे सर्वात मोठे बळ राहिले आहे. सहकारातून समृद्धीचे ब्रीद जपताना आम्हाला अनेक आव्हाने पेलता आली, ती केवळ आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळेच. आजच्या या मंगलप्रसंगी आम्हावर प्रेम करणाऱ्या सर्व मान्यवरांचे, सभासदांचे आणि हितचिंतकांचे मी मनापासून आभार मानतो. पुढील वाटचालीतही हाच विश्वास आणि साथ कायम राहील.'

# धोकादायक खड्डे स्वखर्चाने बुजविले

## • कुमेश मोरे यांची सामाजिक बांधिलकी

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत नगरपरिषद हद्दीतील दहिवली नाक्याजवळील नाजविला बिल्डिंगसमोरील स्पीडब्रेकरजवळ रस्त्याच्या संपूर्ण रुंदीएवढा मोठा खड्डा पडला होता. त्यामुळे वाहनांना धक्का बसून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती. तसेच आकुर्ले येथील जिल्हा परिषद शाळेजवळील उताराच्या रस्त्यावरही रस्त्याच्या रुंदीएवढा मोठा खड्डा असून योग्य उतार (स्लोप) नसल्यामुळे वाहतुकीस धोका निर्माण झाला होता.

ही बाबी नगरसेवक कुमेश पांडुरंग मोरे यांच्या निदर्शनास



आल्यानंतर त्यांनी तात्काळ पुढाकार घेत स्वखर्चाने काँक्रिटिंग करून दोन्ही ठिकाणचे खड्डे बुजवून रस्ता सुरक्षित केला. या कामामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून संभाव्य अपघाताची शक्यता टळली आहे. नागरिकांनी नगरसेवक कुमेश पांडुरंग मोरे यांचे आभार मानत त्यांच्या तत्परतेचे आणि जनहिताच्या कामांप्रती असलेल्या बांधिलकीचे कौतुक केले.

---

## निर्मला ताडकर यांचे निधन

**नागोठणे :** नागोठण्याजवळील वेलशेत गावातील रहिवासी निर्मला तुळशीराम ताडकर (८२) यांचे सोमवारी (दि.८) वृद्धापकाळाने निधन झाले. प्रसिद्ध शाहीर, निवेदक, लेखक, कवी पुंडलिकभाई ताडकर व पहाडी आवाजाचे गायक अशी ओळख



असलेले शीघ्र कवी संतोष (एस. टी) ताडकरांच्या त्या मातोश्री होत. निर्मला ताडकर यांच्या पार्थिवावर वेलशेत येथील वैकुंठ स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

# २७ वर्षांनी पुन्हा भरली दहावीची शाळा

## • पीएनपी तळाघर विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

| चणेरा | प्रतिनिधी |

पीएनपी तळाघर विद्यालयाच्या १९९९ च्या दहावीतील माजी विद्यार्थ्यांनी तब्बल २७ वर्षांनंतर एकत्र येत अविस्मरणीय स्नेहमेळावा साजरा केला. या मेळाव्याने जणू दहावीची शाळाच पुन्हा भरल्याचा अनुभव सर्वांना दिला. तळाघर येथील बयोज् ग्रीन फार्मवर रविवारी (दि.७) आयोजित करण्यात आलेल्या या स्नेहमेळाव्यामध्ये ४० हून अधिक माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. विशेष म्हणजे अनेक मैत्रिणींनी मध्य प्रदेश, गुजरातसह विविध शहरांतून उपस्थित राहून या स्नेहमेळाव्याची शोभा वाढवली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन रुपेश शिंदे, जगदीश बब्रे, मंगेश मोरे, सुशांत



दबडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व मित्रमैत्रिणी तसेच गुरुजनांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यालयातील गुरुवर्य दशरथ कातकर, संदीप दिवेकर आणि ललित पाटील यांचा माजी विद्यार्थ्यांच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. आपल्या विद्यार्थ्यांनी अनेक वर्षांनंतरही गुरूंना स्मरणात ठेवत सन्मान केल्याने शिक्षक भावूक झाले. विद्यार्थ्यांनीही गुरूंचे ऋण व्यक्त करत कृतज्ञतेची भावना व्यक्त केली.

स्नेहमेळाव्यात विविध खेळ, गाणी, कविता आणि आठवणींच्या मनोगतांनी रंगत आणली. काही विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील खट्याळ किस्से सांगत हास्यकल्लोळ उडवला. आज अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहेत. संसाराच्या धावपळीतून वेळ काढून सर्वांनी पुन्हा एकदा विद्यार्थी म्हणून जगण्याचा आनंद अनुभवला. काही क्षणांसाठी का होईना, पण सर्वजण पुन्हा शालेय जीवनात रमले आणि दहावीची शाळा पुन्हा भरल्याचा भास निर्माण झाला.

## जोगेश्वरी महिला मंडळाची सहल

**खांब :** रोहा तालुक्यातील श्री क्षेत्र तळवली तर्फे अष्टमी या गावातील जोगेश्वरी महिला मंडळ (गावठाण) यांची धार्मिक सहल मोठ्या भक्तिभावाने संपन्न करण्यात आली. या सहली अंतर्गत शिर्डी, नाशिक, शनिशिंगणापूर, त्र्यंबकेश्वर आणि देवगड येथील दत्तात्रेय देवस्थान आदी ठिकाणी या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान जोगेश्वरी महिला मंडळाची दरवर्षी सहल काढून धार्मिकस्थळांना भेट देण्याची परंपरा सुरू करण्यात आली आहे. त्याच परंपरेत ही सहल काढण्यात आली होती.

---

पालकमंत्री आशिष शेलार यांचे निर्देश | मुंबईकरांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य

# आरोग्य व्यवस्थेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करा

| मुंबई | प्रतिनिधी |

मुंबईकरांना जागतिक दर्जाची आणि अधिक कार्यक्षम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, तसेच प्रशासकीय कार्यपद्धतीचा सर्वंकष आढावा घेऊन आवश्यक सुधारणा सुचविणारा सविस्तर अहवाल सादर करावा, असे निर्देश मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले. महानगरपालिका



रुग्णालयांतील बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) आणि स्वच्छतागृहांची स्थिती तातडीने सुधारण्याचे आदेश देत आरोग्य सेवांचा नियमित आढावा घेतला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आधुनिकीकरणासंदर्भात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी सहपालकमंत्री मंगल प्रभात लोढा, महापौर रितू तावडे, आमदार, महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री ॲड. शेलार यांनी राज्याच्या आरोग्य विभाग, नगरविकास विभाग आणि महानगरपालिका प्रशासन यांच्यातील समन्वय वाढविण्यासाठी मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत स्वतंत्र बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिले. जागतिक आणि राष्ट्रीय निकषांनुसार आरोग्य सेवा उभारण्यासाठी आर्थिक तरतुदींपलीकडे जाऊन आधुनिक 'मेडिटेक' तंत्रज्ञानाचा वापर करण्याची आवश्यकता त्यांनी यावेळी व्यक्त केली.

महापौर रितू तावडे यांनी आरोग्य विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याची गरज व्यक्त केली. सिद्धार्थ, राजावाडी आणि इतर रुग्णालयांच्या रखडलेल्या पुनर्विकास कामांना गती देण्याबरोबरच नर्सिंग कॉटेज, झिरो प्रिस्क्रिप्शन सेवा, कूपर रुग्णालयात ईएमएस वॉर्ड, केईएममध्ये एआरटी विभाग आणि शीव येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात मॉड्युलर ऑपरेशन थिएटर उभारण्याचे निर्देशही त्यांनी महापालिकेला दिले. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या धर्तीवर 'महापौर वैद्यकीय सहायता कक्ष' स्थापन करून रुग्णांना मदत करण्यासाठी पारदर्शक आणि सुलभ व्यवस्था विकसित करण्याचा प्रस्तावही महापौरांनी मांडला.

मुंबईकरांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देत महानगरपालिका आरोग्य सेवांचा नियमित आढावा घेतला जाईल, असा पुनरुच्चार पालकमंत्री यांनी यावेळी केला.

---

## निवडक




### पर्यावरणपूरक उपक्रमांतून जनजागृती

**कापोली :** श्रीवर्धन तालुक्यात वृक्षसंवर्धन व पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबून लोकांमध्ये जनजागृती व्हावी, यासाठी दि.५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्राईड इंडिया सामाजिक संस्थेच्या वतीने खुजारे व बोरला गावात विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात रितू दयानंद तोंडलेकर, प्रांजली राजेश भायदे, भक्ती सुरज मांजरेकर, प्रथमेश दीपक नागे यांनी सक्रिय सहभाग घेतला. तसेच वनविभागाचे अधिकारी दीपक शिंदे, तेजेश ढेपे, स्वप्नील रासकर, आकाश पोळ, हनुमान कोरडे आणि खुजारे व बोरला गावातील विद्यार्थी, ग्रामस्थ आणि पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन, जलसंधारण आणि स्वच्छता याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थितांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून देत अधिकाधिक वृक्ष लागवड व त्यांचे संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि ग्रामस्थांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व उपस्थितांनी सहकार्य केले. प्राईड इंडिया सामाजिक संस्थेच्या या उपक्रमाचे गावकऱ्यांनी कौतुक केले.

### सोनाली साळवे महसूल सहाय्यकपदी

**माणगाव :** माणगाव येथील अंकुश साळवे यांची कन्या सोनाली अंकुश साळवे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश संपादन करून तिची महसूल सहाय्यकपदी निवड करण्यात आली आहे. सोनालीच्या या उज्वल यशाबद्दल तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. सोनाली साळवे हीचे प्राथमिक शिक्षण पाली येथे झाल्यावर पुढील शिक्षण रोहा येथे घेऊन नंतर अशोकदादा साबळे विद्यालय व




ज्युनिअर कॉलेज माणगाव याठिकाणी तिने महाविद्यालयीन शिक्षण घेतले. नंतर पुढे तिने पुणे येथे बीटेक केले. यानंतर तिने महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाकडून घेण्यात येणाऱ्या एमपीएससीच्या परीक्षेची तयारी घरातूनच ऑनलाईन क्लासद्वारे केली. एमपीएससी परीक्षेची तयारी करताना तिने अथक परिश्रम घेत जिद्द व ध्येय मनात ठेवली. कोणत्याही परिस्थित या परीक्षेत आपण यश मिळवायचाच असा निर्धार तिने आपल्या मनाशी बाळगला. त्यानंतर तासन्तास या परीक्षेचा अभ्यास करून तिने ही परीक्षा मेहनतीच्या व जिद्दीच्या जोरावर यशस्वी करून उत्तीर्ण होऊन आपली ध्येयपूर्ती केली. आपल्या या यशाबद्दल प्रसार माध्यमांजवळ बोलताना सोनाली म्हणाली की, कोणतेही क्षेत्र निवडताना आजच्या मुला-मुलींनी ध्येय, उद्दिष्ट नजरेसमोर ठेऊन अथक परिश्रम घेतले, तर यशाची प्राप्ती ही निश्चितच होत असते. माझ्या या यशात माझे आई-वडीलांची मेहनत तसेच त्यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन मोलाचे ठरले.




### तळगड किल्ल्यावर संवर्धन मोहीम

**तळा :** दुर्गरत्न प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या माध्यमातून तळा शहरातील ऐतिहासिक तळगड किल्ल्यावर संवर्धन मोहीम राबविण्यात आली. दुर्गरत्न प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य गेली अनेक वर्ष छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड किल्ल्यांच्या संवर्धनासाठी कार्य करत असून छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार समाजातील तळागळापर्यंत पोहोचवण्याचे काम करत आहे आणि म्हणूनच दुर्गरत्न प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्यकडून महाराष्ट्रातील अनेक गड किल्ल्यांवर स्वच्छता व संवर्धन मोहीम राबवली जाते. यावेळी तळा शहरातील दुर्ग तळगडावर दुर्गरत्न प्रतिष्ठान तळा विभागाने संवर्धनाचे काम हाती घेतले होते. सलग तीन मोहीम घेतल्यानंतर पूर्णपणे मातीमध्ये गाडल्या गेलेल्या पाण्याच्या टाकीला दुर्गरत्न प्रतिष्ठानच्या मावळ्यांनी आणि रणरागिनींनी मोकळा श्वास मिळवून दिला. या पाण्याच्या टाकीमध्ये अनेक मोठमोठे दगड व मोठ्या प्रमाणावर माती साचली होती आणि ती पूर्ण माती व दगड सलग तीन मोहीम घेऊन आपली तहानभूक विसरून, उन्हाचा मारा सहन करून प्रतिष्ठानच्या सदस्यांनी मेहनत घेऊन मोकळी केली. यामुळे दुर्ग तळगडावरील या टाकीला मोकळा श्वास मिळाला. याप्रसंगी दुर्गरत्न प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याचे पदाधिकारी व जवळपास ७० सदस्य मोहिमेत सहभागी झाले होते.




### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**हमरापूर :** पेण तालुक्यातील कळवे ग्रामपंचायतीतर्फे इयत्ता दहावी व बारावीमध्ये विशेष प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेल्या ५ वर्षीय कक्षा निकेतन मोकल हिचा देखील खास सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास सरपंच सतीश पाटील, उपसरपंच राजश्री पाटील, माजी उपसरपंच निवास पाटील, सदस्य मनीषा पाटील, जयमाला पाटील, सदस्य प्रमोद पाटील, ग्रामपंचायत अधिकारी शामल मोकल, कर्मचारी प्रियंका पाटील, तेजस्विनी पाटील, देविदास पाटील, अल्पेश म्हात्रे, निकेतन मोकल, अनंत पाटील, नारायण पाटील यांच्यासह ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी बोलताना सरपंच सतीश पाटील यांनी ज्या विद्यार्थ्यांनी ९४ टक्केपेक्षा जास्त गुण मिळून गावाचे नाव उज्वल केले आहे, त्यांचे अभिनंदन केले. ग्रामपंचायतीतर्फे कक्षा मोकल तसेच विद्यार्थिनींचा भेटवस्तू, शाल, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

# निवडक


● (छायाचित्र : उदय कळस)

## अग्नीवीर तुषार तांदळेकर याचा सत्कार

**म्हसळा :** तालुक्यातील म्हसळा तालुक्यातील मौजे पाष्टी येथील कु.तुषार किशन तांदळेकर २० वर्ष याची भारतीय सेनेच्या अग्निवीर पदासाठी निवड झाल्याने तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील युवकाने आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या बळावर मिळविलेल्या या यशाबद्दल विविध स्तरांतून त्याचे अभिनंदन होत आहे. यशस्वी निवडीबद्दल म्हसळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांच्या हस्ते तुषार तांदळेकर याचा पुष्पगुच्छ व छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी तुषारला भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देत देशसेवेच्या कार्यात उज्ज्वल यश संपादन करण्याचा विश्वास व्यक्त केला. या सत्कार समारंभासाठी युवासेना तालुका अधिकारी कौस्तुभ करडे यांनी विशेष पुढाकार घेतला. ग्रामीण भागातील युवकांना सैन्यदलात भरती होण्यासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने हा सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी समाजसेवक मंगेश मुंडे उपस्थित होते. त्यांनीही तुषार तांदळेकर याचे अभिनंदन करून त्याच्या यशाचा गौरव केला. पाष्टी गावातील युवकाने भारतीय सेनेत स्थान मिळविल्याने गावासह संपूर्ण म्हसळा तालुक्याचा मान उंचावला असल्याच्या भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

## सुधाकर लाड यांना पुरस्कार प्रदान

**पनवेल :** नवरंग साहित्य संस्कृती आणि कला मंडळ व नेरुळ ज्येष्ठ नागरिक ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. ७ जून रोजी नेरुळ ज्येष्ठ नागरिक भवनात आयोजित केलेल्या साहित्य संमेलनात पनवेलचे ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक सुधाकर लाड यांना पत्रकारिता व साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याच्या सन्मानार्थ नवी मुंबई महानगरपालिकेच्या विद्यमान महापौर सुजाता पाटील यांच्या हस्ते 'नवरंग सन्मान २०२६' हा मानाचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी गज-आनन म्हात्रे यांनी लिहिलेल्या 'एस.एस. रामदास बोट' या हिंदी भाषेत अनुवाद केलेल्या कादंबरीचे प्रकाशन करण्यात आले. दरम्यान गज-आनन म्हात्रे यांना महापौर सुजाता पाटील यांच्या हस्ते 'कादंबरी कोहिनुर' हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.या साहित्य संमेलनास ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. अजित मगदूम, फेस्कॉनचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. एल.बी. पाटील, गज-आनन म्हात्रे, रोहिदास पोटे, नाट्यलेखक रवींद्र वाडकर, ज्येष्ठ साहित्यिका मीलन वासमतकर, कौमुदी गोडबोले, प्रा. प्रतिभा सराफ, तसेच अनिल मुनघाटे, पाकिजा आत्तार, घनश्याम परकाळे, प्रकाश गुमास्ते, साहित्यिक, कवी, साहित्यप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त 'पुस्तक तुला' उत्साहात

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील नेरळ येथील रहिवासी विमल सोपान घुले यांचा ७५ वा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त त्यांच्या पुस्तक तुला उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. मोहाची वाडी येथील साईबाबा मंगल कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात ५० किलोहून अधिक पुस्तकांची तुला करण्यात आली. स्पर्धा परीक्षा, महापुरुषांची चरित्रे तसेच धार्मिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक विषयांवरील सुमारे ६० पुस्तके कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या ग्रंथालयाला भेट देण्यात आली. घुले यांचे पुत्र दिलीप घुले आणि अशोक घुले यांनी ही पुस्तके ग्रंथालयासाठी दान करण्याची घोषणा केली होती. पोलीस भरती व इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या या ग्रंथालयात घुले कुटुंबियांनी दिलेल्या पुस्तकांचा मोठा उपयोग होणार आहे. त्यांच्या या सामाजिक आणि प्रेरणादायी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## नगराध्यक्षांच्या राजीनाम्याकडे लक्ष

**पोलादपूर :** पोलादपूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदावरील महिला सर्वसाधारण आरक्षणानुसार सुरू असलेल्या नेतृत्व बदलाच्या प्रक्रियेत विद्यमान नगराध्यक्षा स्नेहल मेहता यांच्या राजीनाम्याची प्रतीक्षा कायम आहे. सहा महिन्यांचा कार्यकाळ पूर्ण होऊनही अद्याप राजीनामा सादर न झाल्याने पुढील नगराध्यक्ष निवडीची प्रक्रिया आणि पक्ष संघटनेचा निर्णय रखडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.पोलादपूर नगरपंचायतीत आतापर्यंत अश्विनी गांधी, सुनीता पार्टे, नागेश पवार, प्रकाश गायकवाड, राजन पवार, सोनाली गायकवाड, शिल्पा दरेकर आणि स्नेहल मेहता यांनी नगराध्यक्षपद भूषविले आहे. आगामी काळात अस्मिता उमेश पवार यांना नगराध्यक्षपदाची संधी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.शिवसेना पक्षसंघटनेचा निर्णय मान्य राहील, अशी भूमिका नगराध्यक्षा स्नेहल मेहता यांनी यापूर्वी व्यक्त केली होती. मात्र प्रकृतीच्या कारणास्तव राजीनामा सादर करण्यास विलंब होत असल्याचे सांगण्यात येत आहे. यामुळे पुढील नेतृत्व बदलाची प्रक्रिया लांबणीवर पडली असून सत्ताधारी नगरसेवकांसह इच्छुकांमध्ये उत्सुकता वाढली आहे.नगराध्यक्षपदाच्या बदलत्या समीकरणांमुळे आगामी स्थानिक राजकारणावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, स्नेहल मेहता यांच्या राजीनाम्याबाबत पुढील काही दिवसांत स्पष्टता येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● **तातडीची भरती, अलिबाग** रेस्टॉरंट/प्रॉपर्टी/एरिया मॅनेजर हेड शेफ, हाऊसकीपिंग, किचन हेल्पर मोफत राहण्याची व जेवणाची सोय TMS पेरोल अंतर्गत नोकरी. संपर्क : 8976709218 / 8691087302

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# अदानींच्या वीज वाहिनीला ग्रामस्थांचा विरोध

- 'जंगल वाचवा, शेतकऱ्यांचे हक्क जपा'
- टॉवर लाईनसाठी वृक्षतोडीस परवानगी देऊ नका
- बाबू घारे यांचे उपवन संरक्षकांना निवेदन

| नेरळ | प्रतिनिधी |

**कर्जत तालुक्यातून प्रस्तावित वीज वहन प्रकल्पासाठी अदानी समूहाकडून उभारण्यात येणाऱ्या टॉवर लाईनमुळे जंगल, शेती आणि पर्यावरण धोक्यात येण्याची शक्यता असल्याचा आरोप करत जिल्हा परिषद सदस्य बाबू घारे यांनी वन विभागाकडे तीव्र आक्षेप नोंदविला आहे. जंगल क्षेत्रातून आणि खासगी शेतजमिनींतून वीज वाहिनी टाकण्यासाठी कोणतीही परवानगी देऊ नये, तसेच वृक्षतोडीवर तातडीने नियंत्रण आणावे, अशी मागणी त्यांनी जिल्हा उपवन संरक्षकांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.**



घारे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, कर्जत तालुका हा समृद्ध वनसंपदा, जैवविविधता आणि पर्यटनासाठी ओळखला जातो. प्रस्तावित टॉवर लाईन आर्ढे, माले, साळोख, आंबोट, अंजप, पाली, पोटलं, वैजनाथ, भिवपुरी, चिंचवली, कडाव, जांभवळी, कराळेवाडी, भालीवडी, गोलवाडी, मालेवाडी, टाकवे, मार्केवाडी, चांधई, बारणे, गणेगाव-चिंचवली आदी गावांमधून जाणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या मार्गातील अनेक भाग सह्याद्री पर्वतरांगांतील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील (इको-सेन्सिटिव्ह) क्षेत्रात येत असून मोठ्या प्रमाणावर खासगी मालकीच्या शेतजमिनी आणि वनक्षेत्र यांचा समावेश आहे. अशा परिस्थितीत संबंधित शेतकऱ्यांची संमती आणि आवश्यक कायदेशीर परवानग्या घेतल्याशिवाय झाडांची तोड, फांद्या छाटणे किंवा अन्य कोणतेही काम करण्यात येऊ नये, अशी भूमिका घारे यांनी मांडली आहे.

कर्जत तालुक्यात आधीच विविध कारणांमुळे वृक्षतोड वाढत असल्याचा दावा करत त्यांनी वन विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी केली आहे. पर्यावरणाचा समतोल बिघडविणाऱ्या कोणत्याही कामांना आळा घालून जंगल आणि शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करावे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, टॉवर लाईनमुळे अनेक गावांतील शेतीक्षेत्र बाधित होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून या प्रकल्पाबाबत स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे वन विभाग या निवेदनावर कोणती भूमिका घेणार याकडे आता परिसराचे लक्ष लागले आहे.

**वन विभागाला साकडे**

सर्व रोखण्यासाठी जिल्हा परिषद सदस्य बाबू घारे यांनी अलिबाग वनविभाग अधिकारी यांना पत्र देण्यात आले मात्र यावर वनविभाग लक्ष देणार आणि चौकशी करावी अशी मागणी आहे.

# कळंबोलीत विजेचा लपंडाप

## नागरिक उतरले रस्त्यावर

| पनवेल | प्रतिनिधी |

कळंबोली उपनगरात सोमवारी रात्री वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांना उकाड्यात रात्र जागून काढावी लागली. रात्री अनेक वेळा वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर सव्वा अकराच्या सुमारास वीजपुरवठ्याचा एक प्रवाह बंद पडल्याने उपनगरातील मोठा भाग अंधारात गेला. संतप्त नागरिकांनी रात्रीच महावितरणच्या उपकेंद्रात धाव घेतली. कामोठ्यातील वीजप्रश्न सोडविण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष दिले असताना कळंबोलीत मात्र विजेचा लपंडाव सुरू राहिल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.



कळंबोली उपनगरातील वीज ग्राहकांना सोमवारची रात्र उकाड्यात काढावी लागली. रात्री साडे दहा वाजता पहिल्यांदा तीन वेळा वीज गायब झाली. त्यानंतर सव्वा अकरा वाजता विजेच्या तीन प्रवाहांपैकी एक प्रवाह बंद पडला. त्यामुळे निम्म्या उपनगरात वीज आणि अनेक घरांमध्ये अंधार अशी स्थिती निर्माण झाली. विजेच्या लपंडावामुळे हैराण झालेले अनेक कळंबोलीकर रात्रीच रस्त्यावर उतरले आणि त्यांनी उपनगरातील सिडको कार्यालयासमोरील वीज उपकेंद्रात धाव घेतली.

उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांना वीज कधी येणार, असा प्रश्नांचा भडीमार करण्यात आला. जमावातील तरुणांची संख्या वाढू लागल्याने तेथे कळंबोली पोलिसांना पाचारण करण्यात आले. अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलिसांच्या सुरक्षेत महावितरणच्या उपकेंद्राचे प्रवेशद्वार बंद करण्यात आले. त्यामुळे तेथे जमलेल्या नागरिकांची संख्या आणखी वाढली. या दरम्यान महावितरणकडून वाढलेल्या वीज मागणीमुळे दुरुस्तीचे काम सुरू असून काही वेळात वीजपुरवठा पूर्ववत होईल, असे सांगण्यात आले. अखेर रात्री एक वाजता वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. विशेष म्हणजे शनिवार आणि रविवारीदेखील रात्री अकराच्या सुमारास अशाच प्रकारे वीजपुरवठा खंडित झाला होता.

कामोठे उपनगरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने तेथील रहिवाशांनी शनिवारी मध्यरात्री उत्स्फूर्त रास्तारोको करून महावितरणच्या अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले होते. त्यानंतर महावितरणचे कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर यांनी सोमवारी कामोठे उपकेंद्राला भेट देऊन अभियंत्यांसमवेत आढावा घेतला. त्यांच्या निर्देशानुसार सोमवारी रात्री कामोठ्यात अखंडित वीजपुरवठा राखण्यासाठी अधिकारी व कर्मचारी कार्यरत होते. मात्र, कामोठ्यात वीजपुरवठा सुरळीत राहिला असताना कळंबोलीत वीजपुरवठा खंडित झाला. विकसित पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणावर गृहप्रकल्प उभारले जात असल्याने आणि उन्हाळ्यात रात्रीच्या वेळेत वीजेची मागणी वाढत असल्याने महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे विशेष लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

## दहावी-बारावी निकालानंतर दाखल्यांसाठी
# तहसील कार्यालयात गर्दी



| पनवेल | प्रतिनिधी |

दहावी व बारावीच्या निकालानंतर पुढील शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेला वेग आला असून विविध दाखल्यांसाठी पनवेल तहसीलदार कार्यालयातील सेतू सुविधा केंद्र तसेच पुरवठा विभागात नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे.

उत्पन्नाचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, जातीचा दाखला, नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक कागदपत्रे मिळविण्यासाठी विद्यार्थी व पालक सकाळपासून रांगेत उभे असल्याचे चित्र दिसून आले. प्रवेशासाठी लागणारे दाखले वेळेत मिळावेत यासाठी अनेक नागरिकांनी तहसील कार्यालयात धाव घेतली.

वाढती गर्दी लक्षात घेता संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढला असून, नागरिकांना शिस्तबद्ध पद्धतीने सेवा देण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# इंग्रजी माध्यमातून कॉमर्स शाखा सुरू करा

## सुधागड मराठा समाजाची मागणी

| पाली | प्रतिनिधी |

येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता अकरावी-बारावीच्या कॉमर्स शाखेचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून सुरू करावे, अशी आग्रही मागणी सुधागड तालुका मराठा समाजाने केली आहे. यासंदर्भात मराठा समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी संस्थेच्या अध्यक्षा गीता पालरेचा यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.



सुधागड तालुका मराठा समाज व सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा गीता पालरेचा यांच्यात झालेल्या बैठकीत आगामी अकरावी प्रवेश प्रक्रिया, इतर शैक्षणिक प्रवेश तसेच विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी गरीब, गरजू तसेच कोणतीही ओळख नसलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेदरम्यान कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घेतली जाईल. तसेच पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेश प्रक्रिया अधिक सुटसुटीत व पारदर्शक करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन सौ. पालरेचा यांनी दिले.

सध्या पाली येथील ज्युनिअर कॉलेजमध्ये कॉमर्स शाखेचे शिक्षण मराठी माध्यमातून दिले जात आहे. मात्र, बदलत्या शैक्षणिक आणि स्पर्धात्मक वातावरणात विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातील शिक्षणाची गरज भासत असल्याचे मराठा समाजाचे म्हणणे आहे.

# एमआयडीसीविरोधात भूमीपुत्रांचा एल्गार

## नदी प्रदूषणावरून राज पार्टे यांच्या नेतृत्वाखाली मनसेचे आंदोलन

| महाड | प्रतिनिधी |

महाड औद्योगिक क्षेत्रातील वाढते प्रदूषण आणि स्थानिक बेरोजगारांच्या प्रलंबित प्रश्नांवरून महाराष्ट्र नवनिर्माण सेना आता थेट संघर्षाच्या पवित्र्यात आली आहे. महाड एमआयडीसी प्रशासनाच्या मनमानी आणि उदासीन कारभाराला जाब विचारण्यासाठी येत्या गुरुवार, ११ जून रोजी दुपारी १२० वाजता महाड एमआयडीसी प्राधिकरण कार्यालयावर मनसेचा भव्य धडक मोर्चा धडकणार आहे. मनसेचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष राज पार्टे यांच्या नेतृत्वाखाली या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

मनसेने प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, महाड एमआयडीसी परिसरातील कंपन्यांकडून नदीपात्रात सोडले जाणारे रासायनिक सांडपाणी, स्थानिक भूमीमपुत्रांना डावलून परप्रांतीय कामगारांची केली जाणारी भरती, शिवस्वराज्याच्या राजधानीत मराठी पाट्यांकडे होणारे दुर्लक्ष तसेच पोलादपूर ते महाड या मार्गावरील कामगारांसाठी बससेवेचा प्रश्न यांसारख्या विषयांवर एमआयडीसी प्रशासनाला जाब विचारला जाणार आहे. याशिवाय औद्योगिक विकासासोबतच स्थानिकांच्या हक्कांचे आणि पर्यावरणाचे संरक्षण होणे आवश्यक आहे. त्यामुळे या सर्व प्रश्नांवर प्रशासनाकडून ठोस भूमिका आणि कार्यवाहीची मागणी मनसेतर्फे करण्यात येणार आहे.

या आंदोलनासाठी दक्षिण रायगड जिल्ह्यातील मनसैनिक, स्थानिक नागरिक, कामगार आणि भूमिपुत्रांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. "भूमीपुत्रांचा हक्क, महाराष्ट्राचा स्वाभिमान" या घोषवाक्यासह मनसेने या आंदोलनाला दक्षिण रायगडच्या जनतेचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

# महागाईविरोधात शिवसेनेचे रास्ता रोको आंदोलन

| माणगाव | प्रतिनिधी |

वाढत्या महागाईच्या निषेधार्थ शिवसेना ठाकरे पक्षातर्फे माणगाव येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. नवीन एसटी स्थानकासमोर झालेल्या या आंदोलनात माजी मंत्री सुभाष देसाई यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांनी केंद्र व राज्य सरकारविरोधात घोषणाबाजी केली.

यावेळी बोलताना सुभाष देसाई म्हणाले की, पेट्रोल, डिझेल तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवन कठीण झाले आहे. वाढती महागाई आटोक्यात आणण्यासाठी सरकारने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात. जनतेच्या प्रश्नांवर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना नेहमीच जनतेच्या पाठीशी उभी राहिली असून आवश्यक तेव्हा आंदोलनाच्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधण्याचे काम करत असल्याचेही त्यांनी सांगितले. या आंदोलनात जिल्हाप्रमुख नंदू शिर्के, तालुकाप्रमुख प्रभाकर ढेपे, अजित तार्लेकर, नरेश अहिरे, जनार्दन मानकर, चंद्रकांत यादव, मधुकर नाडकर, डॉ. स्वीटी गिरासे, रंजना लुष्टे, मौलाना आरिफ मणेर, अक्षय कदम, अरुण शिगवण यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या, युवासेना सदस्य आदी उपस्थित होते.

# कल्याण-डोंबिवली-पाली बससेवा सुरू

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

सुधागड तालुक्यातील चाकरमानी, ग्रामस्थ आणि पर्यटकांसाठी अत्यंत महत्त्वाची असलेली कल्याण-डोंबिवली ते पाली एसटी बस सेवा सोमवारी (दि. ८) सुरू करण्यात आली आहे. या बसचे पाली येथे आगमन होताच स्थानिक शिवसेना पदाधिकारी आणि नागरिकांच्या वतीने अत्यंत उत्साहात आणि जंगी स्वागत करण्यात आले.


● (छायाचित्र : धम्मशील सावंत)

उपस्थित शिवसेना जिल्हा समन्वयक रायगड राजेंद्र राऊत, अनुपम कुलकर्णी, ओमकार खोडागळे, विनायक जाधव, अवजड वाहतूक सेना प्रमुख शरद फोंडे, सुबोध पालांडे आदी शिवसेना पदाधिकाऱ्यांनी वाहतुक नियंत्रक, बसचे चालक आणि वाहकांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी मोठ्या संख्येने प्रवासी, स्थानिक नागरिक, महिला आणि लहान मुले देखील या सुविधेचा आनंद घेण्यासाठी आणि स्वागत करण्यासाठी उपस्थित होते. ही बस सेवा सुरू झाल्यामुळे संपूर्ण सुधागड तालुक्यातून आनंद व्यक्त केला जात असून, प्रवाशांनी प्रशासनाचे आणि पाठपुरावा करणाऱ्या लोकप्रतिनिधींचे आभार मानले आहेत.

शिवसेना रायगड जिल्हा समन्वयक राजेंद्र राऊत यांनी परिवहन मंत्र्यांकडे ही सेवा सुरू करण्याची मागणी केली होती. ही बस सेवा पुन्हा सुरू झाल्यामुळे आता प्रवासी, विद्यार्थी आणि पर्यटकांचा प्रवास अधिक सुकर होणार असल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

**असे आहे बसचे वेळापत्रक**

- कल्याण (विठ्ठलवाडी) येथून सुटण्याची वेळ : सकाळी ठीक ८.३० वाजता.
- पाली येथून परतीची वेळ दुपारी ठीक १.३० वाजता.

**जनआरोग्य योजनेंतर्गत मोफत वैद्यकीय सेवा** | **आर्थिक दुर्बल कुटुंबांवरील उपचार खर्चाचा भार होणार कमी**

# आयुष रुग्णालयात पहिली शस्त्रक्रिया यशस्वी

| कोर्लई | प्रतिनिधी |

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील आयुष हॉस्पिटलमध्ये महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत पहिली शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली असून, हॉस्पिटलने आरोग्य सेवा क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. यामुळे नांदगाव पंचक्रोशीसह परिसरातील पात्र रुग्णांना शासनाच्या योजनेंतर्गत मोफत व कॅशलेस दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्याचा मार्ग अधिक सुकर झाला आहे.



या योजनेंतर्गत पार पडलेली ही पहिली शस्त्रक्रिया ओपन रिडक्शन इंटरनल फिक्सेशन स्वरूपाची होती. ही शस्त्रक्रिया अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. प्रतीक गुंडरे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडली. अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा, अद्ययावत तंत्रज्ञान आणि अनुभवी वैद्यकीय पथकाच्या सहाय्याने ही शस्त्रक्रिया करण्यात आली.

आयुष हॉस्पिटलने अल्पावधीतच रुग्णांचा विश्वास संपादन केला असून, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत विविध आजारांवरील उपचार व शस्त्रक्रिया पात्र लाभार्थ्यांना पूर्णपणे मोफत व कॅशलेस पद्धतीने उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याची माहिती हॉस्पिटल प्रशासनाने दिली. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवरील उपचार खर्चाचा मोठा भार कमी होणार आहे.

यावेळी आयुष हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. नूतन माळी यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ही सर्वसामान्यांसाठी अत्यंत उपयुक्त योजना असून पात्र नागरिकांनी तिचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. शासनाने उपलब्ध करून दिलेल्या या योजनेमुळे अनेक गंभीर आजारांवरील उपचार आर्थिक अडचणींशिवाय घेणे शक्य झाले आहे. आयुष हॉस्पिटलमध्ये या योजनेअंतर्गत पात्र रुग्णांना मोफत व कॅशलेस उपचार सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

आयुष हॉस्पिटलचे संपूर्ण वैद्यकीय पथक, परिचारिका, तंत्रज्ञ व कर्मचारी वर्ग रुग्णांना सर्वोत्तम आरोग्यसेवा देण्यासाठी सातत्याने कार्यरत असून, ग्रामीण भागातील नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा त्यांच्या जवळच उपलब्ध करून देण्याचा हॉस्पिटलचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी सांगितले.

# पोलीस ठाण्यातून फरार वाहनचोर सहा तासांत जेरबंद

**पनवेल :** कामोठे पोलीस ठाण्याच्या स्वच्छतागृहातील शौचालयाच्या खिडकीतून रविवारी सायंकाळी पलायन केलेल्या वाहनचोराला अवघ्या ६ तासांत पुन्हा अटक करण्यात कामोठे पोलिसांना यश आले. फरार झाल्यानंतर पोलिसांची विविध पथके त्याच्या शोधासाठी रवाना करण्यात आली होती. अखेर मुंबईतील वडाळा येथील त्याच्या निवासस्थानाजवळ सापळा रचून रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास त्याला ताब्यात घेण्यात आले.

चेतन कातकर (२६) असे या आरोपीचे नाव असून, तो मुंबईतील वडाळा परिसरातील गणेशनगर येथे पत्नी व लहान मुलीसह राहतो. शुक्रवारी मानसरोवर रेल्वे स्थानकाजवळील वाहनतळ परिसरात एका दुचाकीची बॅटरी चोरी करताना वाहनतळावरील कर्मचाऱ्याने त्याला रंगेहात पकडले होते. त्यानंतर कामोठे पोलिसांना बोलावून त्याला त्यांच्या ताब्यात देण्यात आले. न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावल्यानंतर चौकशीदरम्यान त्याने कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत चार दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली होती. चोरीच्या इतर घटनांबाबत तसेच चोरीच्या दुचाकींची विक्री कोठे आणि कोणाला केली याची चौकशी सुरू असतानाच रविवारी सायंकाळी चेतन हा कामोठे पोलीस ठाण्याच्या इमारतीतील स्वच्छतागृहाच्या शौचालयातील खिडकीतून पळून गेला. घटनेनंतर पोलीस यंत्रणा सतर्क झाली. आरोपीच्या वडाळा येथील घराचा शोध घेतला. घराला कुलूप असल्याने पोलिसांनी स्थानिक रहिवाशांना विश्वासात घेत आरोपी फरार असल्याची माहिती दिली आणि त्यांची मदत घेतली. रात्रीच्या सुमारास वडाळा येथील निवासस्थानी सापळा रचून चेतन कातकरला पकडण्यात पोलिसांना यश आले.

## उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव, जि.रायगड यांज कडून
## क्रमांक – उविअमा – भूसं / कात –२/ एस.आर. १७८ / २०२६,

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा दोन) चे कलम १, पोट कलम (३) अन्वये काढण्यात आलेली व दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र, भाग चार ब, पृष्ठ क्र. २ ते ३ वर प्रसिध्द करण्यात आलेली उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक आयडीसी २०२४ / (प्र.क्र.४८) / उ –१४ अन्वये उक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे खालील अनुसूचित विनिर्दीष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रास फेब्रुवारी २०२६ या महिन्याच्या तेराव्या दिवसापासून अंमलात येतील, असे महाराष्ट्र शासनाने निर्देश दिले आहेत;

आणि ज्याअर्थी, या खालील अनुसूचीत नमूद केलेल्या जमिनी हया उक्त प्रकरण सहाचे उपबंध उपरोक्ताप्रमाणे अंमलात आले आहेत, अशा क्षेत्रांत आहेत;

आणि ज्याअर्थी, अधिनियमाचे प्रकरण सहा हे ज्या क्षेत्रांस लागू करण्यात आले आहे, अशा क्षेत्रांत असणाऱ्या आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (यानंतर ज्याचा '' उक्त महामंडळ'' असा उल्लेख करण्यात आला आहे) विकास करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा उक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पृष्टयर्थ असेल, अशा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ आवश्यक असणाऱ्या जमिनी संपादन करण्याची शक्ती उक्त अधिनियमांच्या कलम ३२ अन्वये राज्यशासनास प्रदान करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २, खंड (क) अन्वये काढण्यात आलेली अधिसूचना क्रमांक आयडीसी / १८९२ (१७४४१), उद्योग १४, दिनांक ११ जून, १९९३ अन्वये राज्य शासनाचे महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ यातील नियम २८ अन्वये जी कामे जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहेत, अशी उक्त अधिनियमाचे कलम ३२, कलम ३३ पोटकलम (२), कलम ३६ व कलम ३८ खालील जिल्हाधिकाऱ्यांची कामे पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग माणगांव यांची नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी, औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी सोबतच्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या जमिनी महामंडळास आवश्यक आहेत, असे उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव यांचे मत झाले आहे;

त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३२ पोटकलम (२) अन्वये उपरोक्त प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या राज्य शासनाच्या शक्तींचा वापर करुन याद्वारे उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव खाली नमूद केलेल्या जमिनीमध्ये संबंधीत भोगवटादार तसेच इतर कोणत्याही व्यक्तिचा हितसंबंध आणि कोणताही अधिकार असणाऱ्या सर्व व्यक्तींना खाली उल्लेख केलेल्या जमिनीमध्ये उक्त प्रयोजनार्थ भूसंपादन का करण्यात येवू नये ? या संबंधी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत खाली सही करणाऱ्यास लेखी स्वरुपात कारणे दाखविण्याबद्दल नोटीस देत आहे.

ज्यांची व्यक्तीगत सुनावणी करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीसीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत खाली सही करणाऱ्यांच्या कार्यालयात माणगांव येथे समक्ष जातीने किंवा आपल्या कायदेशीर मुखत्यारामार्फत हजर राहता येईल.

ठिकाण – माणगांव,
दिनांक – २७/०५/२०२६.

सही/–
**(डॉ. संदीपान सानप )**
**उपविभागीय अधिकारी,**
**माणगांव उपविभाग, माणगांव**

**अनुसूची**

**जिल्हा – रायगड, तालुका – रोहा, गांव–दुरटोली**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर/गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर.) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | ३७ | पैकी | ०.१८० |
| २. | ३८ | पैकी | ०.११० |
| ३. | ३९ | पैकी | ०.०२५ |
| ४. | ४० | पैकी | ०.०६० |
| ५. | ४४ | १+२+३ पैकी | ०.०५० |
| ६. | ५४ | पैकी | ०.१४० |
| ७. | ५५ | पैकी | ०.१३७ |
| ८. | ५६ | पैकी | ०.००२ |
| ९. | ६८ | पैकी | ०.२७७ |
| १०. | २८६ | पैकी | ०.०४० |
| ११. | २९० | पैकी | ०.३२० |
| १२. | २९४ | पैकी | ०.१०० |
| १३. | २९७ | पैकी | ०.३०० |
| १४. | २९८ | पैकी | ०.१३० |
| १५. | २९९ | १+२पैकी | ०.०४५ |
| १६. | ३०४ | पैकी | ०.१६० |
| १७. | ३०९ | अ+ब पैकी | ०.००८ |
| १८. | ३३६ | पैकी | ०.०८६ |
| १९. | ३३७ | पैकी | ०.०४३ |
| २०. | ३३८ | पैकी | ०.०१८ |
| २१. | ३३९ | पैकी | ०.०५९ |
| २२. | ३६४ | पैकी | ०.०३० |
| २३. | ३६५ | पैकी | ०.०३२ |
| २४. | ३६६ | अ+ब पैकी | ०.१३० |
| २५. | ३६७ | पैकी | ०.०३७ |
| २६. | ३७६ | पैकी | ०.०६५ |
| २७. | ३७७ | पैकी | ०.०६१ |
| २८. | ३७८ | पैकी | ०.००५ |
| २९. | ३८२ | पैकी | ०.००६ |
| ३०. | ३९३ | पैकी | ०.०२१ |
| ३१. | ३९७ | पैकी | ०.२६० |
| ३२. | ३९८ | पैकी | ०.०३० |
| ३३. | ४०० | पैकी | ०.२०० |
| ३४. | ४०१ | पैकी | ०.२२० |
| ३५. | ४३६ | पैकी | ०.०६८ |
| ३६. | ४३७ | पैकी | ०.२७० |
| ३७. | ४४१ | पैकी | ०.१७५ |
| ३८. | ४४२ | पैकी | ०.०७३ |
| ३९. | ४४३ | पैकी | ०.०६८ |
| ४०. | ४५७ | पैकी | ०.११० |
| ४१. | ४६० | पैकी | ०.१३० |
| ४२. | ४६१ | पैकी | ०.००२ |
| ४३. | ४६२ | पैकी | ०.६६० |
| | | **एकुण** | **४.९४३** |

ठिकाण – माणगांव,
दिनांक – २७/०५/२०२६.

सही/–
**(डॉ. संदीपान सानप)**
**उपविभागीय अधिकारी,**
**माणगांव उपविभाग, माणगांव**

**क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/३९/६९७/२०२६**

### अहवाल छपाई कोटेशन मागणी
### पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि.पेण, जि. रायगड

संस्थेच्या वार्षिक अहवाल छपाईसाठी खालील अटी व शर्तीनुसार सीलबंद कोटेशन मागविण्यात येत आहेत.

१) सन २०२५/२०२६ सालातील वार्षिक अहवालाच्या एकूण ३,४०० प्रती
२) मुखपृष्ठ व मलपृष्ठ (४ पाने-पाठपोट) आर्ट पेपर लॅमीनेशन करुन असावे. तसेच संचालक मंडळ, कर्मचारी वर्ग व इतर फोटोंसाठी ग्लेझिंग पेपरचा वापर करुन ऑफसेट पध्दतीने चार रंगांत (Four Colour) छपाई करणे.
३) मुखपृष्ठ व मलपृष्ठावरील फोटो चार रंगात छापणे.(हे फोटो नंतर देण्यात येतील.)
४) अहवालाची साईज २८ x २२ से.मी. असावी व छपाई ऑफसेट पद्धतीने करावी.
५) छपाईचा मजकूर (मॅटर), अहवालाची साईज आणि कागदचा नमुना पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात प्रत्यक्ष भेट द्यावी.
६) निवीदेसोबत (कोटेशन) फी रू.२००/- भरावी लागेल.
७) छापलेल्या अहवालांची डिलिव्हरी संस्थेच्या पेण कार्यालयात पोहोच करावी लागेल.
८) छपाईच्या बिलातून नियमानुसार २% टी.डी.एस. (TDS) कपात केला जाईल.
९) छापलेले अहवाल दिनांक १०/०८/२०२६ पर्यंत संस्थेच्या पेण कार्यालयात मिळणे आवश्यक आहे.
१०) संस्थेने दिलेल्या नमुना अहवालाप्रमाणेच छपाई होणे बंधनकारक आहे, अन्यथा बिलातून रक्कम कपात केली जाईल याची नोंद घ्यावी. तसेच, कोटेशनवर फर्मचा जी.एस.टी (GST) आणि पॅन कार्ड (PAN Card) क्रमांक नमूद करणे अनिवार्य आहे.

वरील कोटेशन दिनांक ०३/०७/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत संस्थेच्या पेण कार्यालयात पोहोचतील अशा बेताने पाठवावीत. अहवाल छपाईच्या कामाविषयी सविस्तर माहीती संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत समक्ष मिळेल. कोणतेही कोटेशन मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अंतिम अधिकार संचालक मंडळाने राखून ठेवला आहे.

ठिकाण :- पेण
दिनांक: १०/०६/२०२६

| श्री.नितिन वसंत वर्तक | श्री.मोहन बाळाराम भोईर | श्री.विज्ञान भास्कर पाटील | श्री.आनंद हिराजी पाटील |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | मानद सचिव | व्हा.चेअरमन | चेअरमन |

**महावितरण** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

### ई–निविदा सूचना

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-०५, टी-०६, टी-०७, टी-०८, टी-०९, टी-१०, टी-११, टी-१२, टी-१३, टी-१४, टी-१५, टी-१६, टी-१७, टी-१८ आणि टी-१९ (२०२६-२७) अशा एकुण **पंधरा** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. १०.०६.२०२६ पासून ते दि. १६.०६.२०२६** @२३.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. १६.०६.२०२६ ला २३.५५** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

**(सही)**
**कार्यकारी अभियंता (स्था.) , स्थापत्य विभाग भांडुप**

**महावितरण** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

### निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग रोहा कार्यालया अंतर्गत असणारे लघुदाब व उच्चदाब वाहिन्या यांच्या प्रीव्हेंटिव्ह देखभाल व दुरुस्तीच्या कामा करिता वर्ष २०२६–२७ च्या करारासाठी परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नियुक्ती करणेसाठी ई–निविदा क्रमांक टी–०६ ते टी–१५, २०२६–२७ एकूण १० निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि. ०९.०६.२०२६ ते १०. ०६. २०२६ पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारिख दि. १०.०६.२०२६ रात्री ११.५५ वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत / शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेतस्थळावर प्रकाशित केला जाईल.

**PRO NO. 66** **कार्यकारी अभियंता, रोहा विभाग.**

### जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक दीपा केतन खडे व भक्ती संदीप राऊत यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे गुढवण, ता.कर्जत, जि. रायगड | ११/१/ब | ०.३०.६० | २.१९ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : ०९/०६/२०२६

**ॲड.उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु.पो.चिंचवळी ता.कर्जत
जि. रायगड
मो.नं.९०४९४८६८०५

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशीलांनी मौजे आपटवणे ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे- झाप ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | गट न./स.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री शिरिषकुमार सदानंद पाटील | २२५ | ०-५१-६० | ४-३९ |
| | २११ | १-६६-०० | ०-५० |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्युपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहीवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहीवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत ७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली - सुधागड
दिनांक : ०९/०६/२०२६

सही /-
**श्री. प्रभाकर कृष्णकांत भोईर**
ॲडव्होकेट
मु.पो.नविन पनवेल ता.पनवेल जि.रायगड
मो.बा.नं. ८१४९६५१५०८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मोगरज, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत तिचे मालक श्री. तिलक कृष्णा देवरूखकर रा. १५/ए, ओम गुरूनाथ सीएचएस, टाटा लेन, शिव मंदिर कॉस रोड जवळ, राम नगर डोंबिवली पूर्व, ठाणे, महाराष्ट्र- ४२१२०१ यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं/ गट नं/ हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.पै) |
|---|---|---|
| ५४-१-अ | ०-४०-०० | ०-२७ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ९/०६/२०२६

**ॲड. सिद्धेश शंकर साखरे**
ऑफीस-वसंत पॅराडाईज, फ्लॅट नं.१०१/१,
पहिला पहिला, कोतवाल नगर,
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.८९८३४८१५६७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मोगरज, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत तिचे मालक श्री. शैलेश श्रीधर जगे रा. ए-२, फ्लॅट नं. ९०५, अंबर इनक्लेव सीएचएस ठाकुर्ली पत्री पुल रोड, लक्ष्मी पार्क मांगे, कांचनगाव, ठाकुर्ली ईस्ट, कल्याण, ठाणे, ठाकुर्ली, महाराष्ट्र - ४२१२०१ यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं/ गट नं/ हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.पै) |
|---|---|---|
| ५४-१-अ | १-९२-०० या क्षेत्रापैकी विकत देत असलेले अविभाज्य क्षेत्र ०-८०-०० | १-२८ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हकहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ९/०६/२०२६

**ॲड. सिद्धेश शंकर साखरे**
ऑफीस - वसंत पॅराडाईज, फ्लॅट
नं. १०१/१, पहिला पहिला, कोतवाल नगर,
कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो.८९८३४८१५६७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी मौजे बेंडसे ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत सदर मिळकतीचे मालक सौ. ज्योती महेंद्र ठाकुर यांचेकडून विकत घेण्याची ठरवलेली आहे.

| सर्व्हे क्रमांक | क्षेत्र चौ.मी | आकार |
|---|---|---|
| २४ | ४ अ | ०-२४-० |
| २५ | १ क | ०-५६-७ |
| २५ | ४ | ०-०४-२ |
| २६ | १ | ०-१५-२ |
| २६ | २ | ०-१७-७ |
| २६ | ३ | ०-०९-८ |
| २६ | ४ | ०-०७-६ |
| २८ | १ | ०-०१-० |
| २८ | २ | ०-०५-० |
| २८ | ३ | ०-०७-० |
| २८ | ४ अ | ०-२४-० |
| २८ | ५ | ०-०२-० |
| २८ | ६ | ०-०६-० |
| २९ | ३ | ०-०९-० |
| २९ | ४ | ०-०७-० |
| २९ | ६ | ०-०८-० |
| २९ | ७ | ०-०८-० |
| २९ | ८ | ०-११-० |
| २९ | ९ | ०-०६-० |
| २९ | १० अ | ०-२१-० |
| २९ | १० ब | ०-४३-० |
| २९ | १२ | ०-१३-० |
| २९ | १३ | ०-०६-० |
| २९ | १४ अ/१ | ०-६१-० |
| २९ | १४ अ/२ | ०-६१-० |
| २९ | १४ ब | ०-४९-० |
| २९ | १४ क | ०-४१-० |
| २९ | १५ | ०-११-० |
| २९ | १६ ब | ०-२०-० |
| २९ | १७ | ०-०८-० |
| २९ | १८ | ०-०९-० |
| २९ | १९ | ०-१६-० |
| २९ | २० | ०-०८-० |
| ३१ | ४ | ०-३४-० |
| ३२ | २ | ०-५३-५ |
| ३२ | ६ब | ०-२०-० |

सबब सदर व्यवहारा बाबत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदर जाहिर नोटीसी प्रसिद्ध केल्यापासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत दाखल न झालेस सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पुर्णकेला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत.

दिनांक : ०९/०६/२०२६

**ॲड. ऋषीकेश अनिल कांबळे**
बी. ए. एल. एल. बी.
नेरळ, कुंभार आळी, जिल्हा परिषद शाळेसमोर,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९५६१७३४३७७

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# खेळाडूंच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

## || इंग्लंड टीमच्या बेस कॅम्पजवळ थरार || अंधाधुंद गोळीबारात ९ जखमी




| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

फिफा विश्वचषक २०२६ सुरू होण्याच्या काही दिवसआधी, अमेरिकेत अंदाधुंद गोळीबाराची एक घटना घडली. अमेरिकेत अशा घटना सर्रास घडत असतात. यावेळी, अमेरिकेतील ही अंदाधुंद गोळीबाराची घटना चर्चेत आहे, कारण ती फिफा विश्वचषक २०२६ साठीच्या इंग्लंड संघाच्या बेस कॅम्पजवळ घडल. इंग्लंड संघाचा बेस कॅम्प मिसौरीमधील कन्सास सिटी येथे आहे, जिथे गोळीबाराचा आवाज ऐकू आला. या अंदाधुंद गोळीबारात नऊ जण जखमी झाले आहेत.

कन्सास सिटी पोलिसांनी सांगितले की, हा गोळीबार शनिवारी पहाटे ४ वाजता इंग्लंड संघाच्या बेस कॅम्पपासून १० मिनिटांच्या अंतरावर झाला असून इंग्लंड संघाचे हॉटेल घटनास्थळापासून अगदी जवळ होते. परंतु, इंग्लंड संघ फिफा विश्वचषक २०२६ साठी अद्याप कन्सास सिटीमध्ये दाखल झाला नव्हता. जेव्हा कॅन्सस सिटीमध्ये ही घटना घडली, तेव्हा इंग्लंड संघ फ्लोरिडातील पाम बीच येथे विश्वचषकासाठी सराव करत होता. इंग्लंड संघ १३ जून रोजी कन्सास सिटीमध्ये दाखल होईल.

कन्सास सिटी पोलीस विभागाच्या एका कॅप्टनच्या म्हणण्यानुसार, गोळीबाराचा आवाज ऐकताच ते तात्काळ घटनास्थळी पोहोचले. तिथे पोहोचल्यावर त्यांना चेंगराचेंगरी झाल्याचे आढळले. या घटनेत जखमी झालेल्या तीन महिलांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. चेंगराचेंगरीमुळे जखमींची संख्या झपाट्याने नऊवर पोहोचली. त्यानंतर, त्यांना जवळच्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, सध्या कोणालाही ताब्यात घेण्यात आलेले नाही, परंतु घटनास्थळी पेट्रोलिंग सुरू आहे.

फिफा विश्वचषक २०२६ मध्ये सहभागी होण्यापूर्वी, इंग्लंडने न्यूझीलंडविरुद्ध एक सराव सामना खेळला, ज्यात त्यांनी १-० ने विजय मिळवला. त्यांचा दुसरा सराव सामना बुधवारी कोस्टा रिकाविरुद्ध होईल. संघ १३ जून रोजी कन्सास सिटीसाठी रवाना होईल. फिफा विश्वचषक २०२६ दरम्यान कॅन्सस सिटी हे इंग्लंडचे मुख्य बेस कॅम्प असेल.

### हल्लेखोराचा शोध सुरु

कॅन्सस सिटी पोलीस विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, गोळीबारात जखमी झालेले सर्व नऊ जण धोक्याबाहेर असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, जखमींपैकी किमान तिघांना त्यांच्या प्रकृतीमुळे तात्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी पुष्टी केली आहे की या प्रकरणात अद्याप कोणालाही संशयित म्हणून ताब्यात घेण्यात आलेलं नाही. गुन्हा केल्यानंतर हल्लेखोर पळून जाण्यात यशस्वी झाला असून, स्थानिक पोलीस आणि सुरक्षा यंत्रणा त्याचा शोध घेण्यासाठी छापे टाकत आहेत.

# ऋतुराजची द्रविड-गांगुलीच्या विक्रमाशी बरोबरी

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

श्रीलंकेत सुरू असलेल्या तिरंगी वनडे मालिकेतील पहिला सामना भारत 'अ' विरुद्ध श्रीलंका 'अ' संघात सुरू आहे. डंबुला येथे होत असलेल्या या सामन्यात भारतीय 'अ' संघाचे कर्णधार आणि उपकर्णधार ऋतुराजने दमदार कामगिरी केली आहे. त्यामुळे भारताच्या डावाला आकार मिळाला असून २०० धावांचा टप्पा पार झाला आहे. या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता.



भारताकडून प्रभसिमरन सिंग आणि वैभव सूर्यवंशी यांना डावाची सुरुवात केली. वैभवचा १४ धावांवर झेल श्रीलंकेचा कर्णधार साहन अराच्चिगेने घेतला. पाठोपाठ प्रभसिमरनही २ धावांवर बाद झाला. नंतर प्रियांश आर्यने आक्रमक खेळ करत डाव पुढे नेला, त्याला दुसऱ्या बाजूने ऋतुराज संयमी खेळ करत साथ देत होता. मात्र, प्रियांशही ३२ धावांवर धावबाद झाला. यानंतर ऋतुराजला तिलक वर्माची साथ मिळाली. दोघेही सुरुवातीला संथ खेळत होते. त्यामुळे त्याने ६५ चेंडूत अर्धशतकही पूर्ण केले. त्याने आणि तिलकने डाव सांभाळत शतकी भागीदारी केली. त्याच्यापाठोपाठ तिलक वर्मनेही अर्धशतक केले. तिलकसोबत दीडशतकी भागीदारी करत संघाला २०० धावांचा टप्पाही पार करून त्याने ११२ चेंडूत ६ चौकार ३ षटकारांसह त्याचे शतकही पूर्ण केले.

ऋतुराजचा कारकिर्दीतील १०० वा लिस्ट ए सामना आहे. त्याने आत्तापर्यंत लिस्ट 'ए' क्रिकेटमध्ये ६० च्या सरासरीने ५००० हून अधिक धावा केल्या आहेत. विशेष म्हणजे मंगळवारी केलेलं शतक त्याचे लिस्ट 'ए' क्रिकेटमधील २१ वे शतक होते. त्यामुळे तो आता लिस्ट 'ए' क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके करणाऱ्या भारतीय खेळाडूंच्या यादीत सहाव्या क्रमांकावर आला असून त्याने राहुल द्रविड आणि गौतम गंभीरची बरोबरी केली आहे.

### लिस्ट 'ए' मध्ये शतके करणारे भारतीय

सचिन तेंडुलकर (५५१ सामने) ५९ शतके - विराट कोहली (३४७ सामने)३७ शतके - रोहित शर्मा (३५५ सामने)३१ शतके - सौरव गांगुली (४३७ सामने)३० शतके - शिखर धवन (३०२ सामने)२१ शतके - गौतम गंभीर (२९९ सामने)२१ शतके - राहुल द्रविड (४४९ सामने)२१ शतके - ऋतुराज गायकवाड (१०० सामने)२० शतके - मयंक अगरवाल (१३२ सामने).

## राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायद्याला मंजुरी

**कोलकता :** अखिल भारतीय फुटबॉल संघटनेने राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायद्याला मंजुरी दिली आहे. एआयएफएफची विशेष सर्वसाधारण बैठक शनिवारी पार पडली. ही बैठक एआयएफएफचे कल्याण चौबे यांच्या अध्यक्षतेखाली कोलकतामध्ये झाली. बैठकीला १९ कार्यकारी समिती सदस्य, ३२ राज्य संघटनांचे प्रतिनिधी आशियाई फुटबॉल संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते. सभेमध्ये एकमताने राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायदा स्वीकारण्याचा तोडगा निघण्याची बीसीसीआय सचिवांकडून निर्णय घेतला.

# निरल वाडेकरचा जागतिक मंचावर डंका

| पुणे | प्रतिनिधी |

अहमदाबाद येथे ४ ते ८ जून दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या या पहिल्या वर्ल्ड योगासन चॅम्पियनशिपमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करताना, या तरुण खेळाडूने उद्दिष्टांसह स्पर्धेत प्रवेश केला होता: आपली सर्वोत्तम कामगिरी करणे, चुका टाळणे आणि गळ्यात सुवर्णपदक घालून पोडियमवर अभिमानाने उभे राहणे. पहिल्याच वर्ल्ड योगासन चॅम्पियनशिप २०२६ मध्ये एक नव्हे, तर दोन सुवर्णपदके जिंकून तिने हा ऐतिहासिक टप्पा यशस्वीपणे गाठला. दोन सुवर्णपदके पटकावल्यानंतर निरलने




आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक खेळाडूची जिंकण्याचीच इच्छा असते आणि मीही त्याला अपवाद नव्हते. माझी स्वतःकडून हीच अपेक्षा होती की, मी माझी सर्वोत्तम कामगिरी करेन आणि सुवर्णपदकासाठी झुंज देईन; जी मी एक नव्हे तर दोन सुवर्णपदके जिंकून पूर्ण केली आहे.

मला याचा अत्यंत आनंद आहे की मी स्वतःला, माझ्या कुटुंबाला आणि माझ्या देशाला अभिमानी बनवले आहे. भविष्यात एक मफायटर पायलटफ बनणे हे माझे स्वप्न आहे. त्याच वेळी, मला योगासनातील माझा प्रवासही असाच सुरू ठेवायचा आहे आणि भारतासाठी आणखी मोठे यश मिळवायचे आहे. ही दोन्ही स्वप्ने माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत, असे तिने सांगितले.

## इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघात बदल

**नवी दिल्ली :** भारतीय संघ १ जुलैपासून इंग्लंडविरुद्ध पाच टी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहे. पण, या मालिकांपूर्वी भारतीय संघात बदल केला गेला आहे. बीसीसीआयच्या वैद्यकिय टीमने आणि संघ व्यवस्थापन यांच्यात झालेल्या चर्चेनंतर हा बदल करण्याचा निर्णय घेतला गेला आहे. भारतीय संघाचा प्रमुख गोलंदाज सिराज याला विश्रांती देण्याचा निर्णय घेतला गेला आहे. सिराजच्या जागी भारताच्या टी-२० संघात प्रसिद्ध कृष्णाचा समावेश केला गेला आहे.




# मुंबईत आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महोत्सव

## जगभरातील दिग्गज खेळाडू एकाच पटावर

| मुंबई | प्रतिनिधी |

सर्वात मोठ्या चेस फेस्टिव्हलपैकी एक असलेल्या ३६० ग्लोबल चेस फेस्टिव्हल २०२६ चे आयोजन मुंबईत करण्यात आले आहे. या स्पर्धेत देशातील तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित बुद्धिबळपटू सहभागी होणार असून, चौसष्ठ घरांच्या पटावर रोमांचक सामने रंगणार आहेत.

कफ परेड येथील वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये १० जून ते १८ जून या कालावधीत या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. इंडियन चेस स्कूलच्या माध्यमातून आणि ३६० वनच्या पुढाकाराने ही स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. या महोत्सवात विविध गटांतील खेळाडूंना आपले कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळणार असून, बुद्धिबळप्रेमींसाठीही हा महोत्सव विशेष आकर्षणाचा ठरणार आहे. देश-विदेशातील अनेक नामांकित खेळाडूंच्या सहभागामुळे स्पर्धेची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

भारतात बुद्धिबळ खेळाडूंची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात असूनही त्यांना पुरेशा संधी मिळत नसल्याची खंत आघाडीच्या ग्रँडमास्टर्सनी व्यक्त केली. मग्लोबल चेस फेस्टिव्हल २०२६ च्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात त्यांनी बुद्धिबळाच्या प्रसारासाठी अधिक स्पर्धा आणि शालेयस्तरावर प्रोत्साहनाची गरज अधोरेखित केली आहे.

सध्या भारताचा अव्वल मानांकित खेळाडू पी. इनियन यानं सांगितले की, देशात लहान मुलांमध्ये बुद्धिबळाची प्रचंड गुणवत्ता दडलेली आहे. मात्र, त्यांना योग्य संधी उपलब्ध होताना दिसत नाही. शालेय स्तरावर या खेळाचा अधिक प्रचार आणि प्रसार होणे आवश्यक आहे.

# इराणचा फुटबॉल संघ मेक्सिकोमध्ये दाखल

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

युद्धाचा तणाव आणि व्हिसाच्या अडथळ्यांवर मात करुन, इराणचा फुटबॉल संघ अखेर मेक्सिकोमध्ये दाखल झाला आहे. आगामी फिफा विश्वचषक स्पर्धेला अवघे चार दिवस उरले आहेत. तुर्कीमधील अंताल्या इथं कठोर सराव सत्रानंतर, इराणचा संघ शनिवारी विमानाने रवाना झाला आणि मेक्सिकोमधील तिजुआना इथं पोहोचला आहे.




फेब्रुवारीमध्ये अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर, संघाच्या विश्वचषकातील सहभागावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही सुरक्षेची चिंता व्यक्त करत इराणी संघाचा सहभाग अयोग्य असल्याचे म्हटले होते. मात्र, इराणी फुटबॉल असोसिएशननं तीव्र आक्षेप घेतला आणि स्पष्ट केले की, ही स्पर्धा फिफाची आहे, कोणत्याही एका देशाची नाही. याच ठाम भूमिकेमुळे संघ आज मैदानात उतरण्यास सज्ज झाला आहे.

इराणच्या विश्वचषक प्रवासातील सर्वात मोठा अडथळा व्हिसाच्या समस्या ठरल्या आहेत. अलीकडेच, अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांनी स्पष्ट केले की, खेळाडूंचे स्वागत आहे, परंतु त्यांच्यासोबत येणाऱ्या ज्यांची लष्करी पार्श्वभूमी आहे किंवा ज्यांचा इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सशी संबंध आहे, त्यांना प्रवेश दिला जाणार नाही. या धोरणानंतर, अमेरिकन प्रशासनानं इराण फुटबॉल फेडरेशनचे अध्यक्ष आणि माजी आयआरजीसी कमांडर मेहदी ताज यांच्यासह सुमारे डझनभर प्रशिक्षक, ट्रेनर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे व्हिसा नाकारले आहेत.

## अहमदाबादमध्ये झालेल्या बैठकीत शिक्कामोर्तब | १ ऑक्टोबर २०२६ पासून अंमलबजावणी

# कसोटीत होणार गुलाबी चेंडूचा वापर

| दुबई | वृत्तसंस्था |

आयसीसी आता खराब प्रकाशामुळे बाधित होणार्या कसोटी सामन्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर 'पिंक बॉल' (गुलाबी चेंडू) वापरण्याची परवानगी देणार आहे. खराब प्रकाशामुळे खेळ लवकर थांबवला जाणे टाळण्यासाठी आणि दिवसातील पूर्ण षटके खेळवून घेण्यासाठी आयसीसीने हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. अहमदाबाद येथे झालेल्या आयसीसी बोर्डाच्या वार्षिक बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. हा नियम काही अटींनुसार लागू केला जाणार आहे. यात दोन्ही संघांची पूर्व संमती, सामन्याची सुरुवात लाल चेंडूने असावी, याचा समावेश असणार आहे. यासाठी मालिका सुरू होण्यापूर्वी दोन्ही सहभागी संघांनी या बदलासाठी लेखी संमती देणे बंधनकारक असेल. नैसर्गिक सूर्यप्रकाश कमी झाल्यास पंच फ्लडलाईटस् सुरू करतील आणि दिवसाची उर्वरित षटके पूर्ण करण्यासाठी गुलाबी चेंडू खेळात आणला जाईल, असे यात नमूद आहे. आयसीसीच्या या नवीन नियमांची अधिकृत अंमलबजावणी १ ऑक्टोबर २०२६ पासून होईल.

प्रत्यक्ष सामन्यात हा नियम कसा काम करेल? समजा, दिवसाच्या ९० षटकांपैकी ७५ षटके पूर्ण झाली आहेत आणि त्यानंतर प्रकाश खूपच कमी झाला आहे, अशा वेळी खेळ लवकर थांबवण्याऐवजी उर्वरित १५ षटके फ्लडलाईटस् लावून आणि गुलाबी चेंडू वापरून पूर्ण केली जातील. आयसीसीचे इतर महत्त्वाचे नियम बदलआयसीसीने गुलाबी चेंडूच्या प्रयोगाव्यतिरिक्त या बैठकीत इतरही काही मोठे निर्णय घेतले आहेत.सामन्यादरम्यान मिळणाऱ्या ड्रिंक्स ब्रेकमध्ये मुख्य प्रशिक्षक किंवा त्यांचे सहायक खेळाडूंशी चर्चा करण्यासाठी सीमारेषेच्या आत जाऊ शकतील. स्थानिक आणि नवख्या पंचांना मदत म्हणून आता संघांना प्रत्येक डावात एक जास्तीचा चुकीचा रिव्ह्यू (कसोटीत ३ आणि मर्यादित षटकांच्या सामन्यात २ वापरण्याची परवानगी असेल.

### हॉक-आय ट्रॅकिंग

संशयास्पद गोलंदाजीची ॲक्शन तपासण्यासाठी आणि त्याचा अहवाल तयार करण्यासाठी मॅच ऑफिशियल आता रिअल-टाईम हॉक-आय डेटाचा वापर करू शकतील. लेग-साईड वाईड नियम कायम : मर्यादित षटकांच्या सामन्यांमध्ये लेग-साईडला जाणार्या चेंडूसाठी वापरला जाणारा कडक वाईडचा नियम आता कायमस्वरूपी लागू करण्यात आला आहे.



## निवडक




### रिलेतील भारताला सुवर्णपदक

**नागठाणे :** जागतिक थलेटिक्स कॉन्टिनेंटल टूरमध्ये महिलांच्या चार बाय १०० मीटर रिले स्पर्धेत भारतीय संघाने सुवर्णपदक पटकाविले. त्यात सातारकर धावपटू सुदेष्णा शिवणकर हिने दमदार कामगिरी करत आपला ठसा उमटविला. तैवानमधील न्यू तैपेई सिटीमध्ये सध्या जागतिक थलेटिक्स कॉन्टिनेंटल टूर स्पर्धा सुरू आहे. त्यात शनिवारी बानकियाओ स्टेडियमवर झालेल्या महिलांच्या चार बाय १०० मीटर रिले स्पर्धेत भारतीय संघाने अग्रस्थान मिळवत सुवर्णपदक पटकाविले. या संघात साताऱ्याची अव्वल धावपटू सुदेष्णा शिवणकर हिचा समावेश आहे. सुदेष्णाने एस. एस. स्नेहा, श्रावणी नंदा, तमन्ना यांच्या सोबतीने ही स्पर्धा ४४.०७ सेकंदांची वेळ नोंदवित पूर्ण केली. उल्लेखनीय म्हणजे या संघाने स्पर्धेच्या विक्रमाची बरोबरी साधत सुवर्णपदक पटकाविले. त्यांनी स्पर्धेत दुसऱ्या स्थानी राहिलेल्या व्हिएतनामवर ०.३१ सेकंदांच्या मोठ्या फरकाने विजय मिळवला. सातत्यपूर्ण कामगिरीजावळी तालुक्यातील खर्शी या छोट्याशा गावातून सुदेष्णाचा प्रवास सुरू झाला आहे. आजवर राष्ट्रीय पातळीवर ६४, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर तीन पदके तिने मिळविली आहेत. 'खेलो इंडिया' स्पर्धेत सलग सहा वर्षे सुवर्णपदक मिळणारी सुदेष्णा ही देशाची एकमेव खेळाडू आहे. गेली आठ वर्षे ती राष्ट्रीय प्रशिक्षक बळवंत बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली अथक मेहनत घेऊन सराव करत आहे.

### अर्जुन तेंडुलकरचा वानखेडेवर धडाका

**मुंबई :** क्रिकेटचा देव मानल्या जाणाऱ्या सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकर पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. टी २० मुंबई लीगमध्ये अर्जुनने आपल्या अष्टपैलू खेळाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. गोलंदाजीत प्रतिस्पर्धी संघाची दाणादाण उडवल्यानंतर त्याने फलंदाजीतही वादळी खेळी करत संघाला शानदार विजय मिळवून दिला. वानखेडे स्टेडियमवर ८ जून रोजी बांद्रा ब्लास्टर्स आणि -RCS अंधेरी यांच्यात सामना रंगला. या सामन्यात -RCS अंधेरीकडून खेळणाऱ्या अर्जुन तेंडुलकरने प्रथम गोलंदाजीत आपली छाप पाडली. डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाने केवळ ३ षटकांत ११ धावा देत ३ महत्त्वाचे बळी घेतले. विशेष म्हणजे त्याने टाकलेल्या १८ चेंडूंपैकी तब्बल १३ चेंडू निर्धाव होते. अर्जुनच्या अचूक आणि भेदक गोलंदाजीमुळे बांद्रा ब्लास्टर्सचा डाव २० षटकांत ९ बाद १४४ धावांवर आटोपला. त्यानंतर १४५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना -RCS अंधेरीला सुरुवातीला एक धक्का बसला. मात्र, त्यानंतर अर्जुन तेंडुलकर मैदानात उतरला आणि सामन्याचे चित्रच बदलून टाकले. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या अर्जुनने ३४ चेंडूत नाबाद ६६ धावांची तुफानी खेळी केली. अर्जुनच्या या दमदार खेळीमुळे -RCS अंधेरीने ९ विकेट्स राखून सहज विजय मिळवला. गोलंदाजीत ३ विकेट्स आणि फलंदाजीत नाबाद ६६ धावा अशी अष्टपैलू कामगिरी करत अर्जुन तेंडुलकर सामन्याचा खरा हिरो ठरला. मुंबई लीगमधील त्याच्या या शानदार प्रदर्शनानंतर क्रिकेट चाहत्यांमध्ये त्याच्या भविष्यातील कारकिर्दीबाबत उत्सुकता आणखी वाढली आहे.



### वैभव सूर्यवंशीची जादू 'अपयशी'

**नवी दिल्ली :** वैभव सूर्यवंशीने टी-२० क्रिकेटमध्ये शानदार फलंदाजी करत भरपूर धावा केल्या आहेत. काही दिवसांपूर्वीच, त्याची बॅट जणू वादळच बनून होती. जगातील कोणताही गोलंदाज त्याच्या तडाख्यातून सुटू शकला नाही. आता, टी-२० मधून एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण करताच तो पूर्णपणे अपयशी ठरला. तो पूर्वीसारखे चौकार आणि षटकार मारू शकला नाही, तसेच त्याच्या स्ट्राइक रेटमध्येही सुधारणा झाली नाही. तथापी, मालिका अजून बाकी असल्याने, त्याला स्वतःला सिद्ध करण्यासाठी आणखी काही संधी मिळतील. तीन देशांमधील त्रिकोणीय मालिका श्रीलंकेत सुरू झाली आहे. पहिला सामना भारत 'अ' आणि श्रीलंका 'अ' यांच्यात खेळला जात आहे. भारतीय संघाचा कर्णधार तिलक वर्माने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. वैभव सूर्यवंशी आणि प्रभसिमरन सिंग भारताची सलामीची जोडी म्हणून क्रीजवर आले. प्रभसिमरनने सुरुवातीला सूत्रे हाती घेतली, पण त्याने आपल्या पहिल्याच षटकात निर्धाव षटक टाकले. यानंतर, वैभव गोलंदाजीला आल्यावर आपली छाप पाडेल अशी आशा होती. पण तो प्रभावहीन दिसला.



### न्यूझीलंडची लॉर्ड्स कसोटीत घसरण

**नवी दिल्ली :** इंग्लंड आणि न्यूझीलंड क्रिकेट संघातील तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना, जो ४ जून रोजी लॉर्ड्सवर सुरु झाला, चौथ्या दिवसाच्या खेळाच्या पहिल्या सत्रातच संपला. गोलंदाजांनी सामन्यावर पूर्णपणे वर्चस्व गाजवलं, हा सामना यजमान इंग्लंडने अखेरीस ११५ धावांनी जिंकला. इंग्लंडने न्यूझीलंडसमोर चौथ्या डावात २५३ धावांचं लक्ष्य ठेवलं होतं, परंतु कीवी संघ त्यांच्या दुसऱ्या डावात केवळ १३८ धावांवर सर्वबाद झाला, ज्यामुळं त्यांना पराभव पत्करावा लागला. यामुळं जागतिक कसोटी चॅम्पियनशिप २०२५-२७ च्या गुणतालिकेतही बदल झाला आहे. या विजयामुळं इंग्लंडला फारसा फायदा झाला नसला तरी, न्यूझीलंड दुसऱ्या स्थानावरुन चौथ्या स्थानावर घसरला आहे. या कसोटी मालिकेच्या सुरुवातीपूर्वी डब्ल्यूटीसी २०२५-२७ च्या गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर असलेला न्यूझीलंड संघ, लॉर्ड्सवरील कसोटी सामना गमावल्यानंतर आता चौथ्या स्थानावर घसरला आहे. चार सामन्यांतून दोन विजय, एक पराभव आणि एक बरोबरीसह त्यांचे ५८.३३ गुण झाले आहेत. दरम्यान, इंग्लंड मालिका सुरु होण्यापूर्वी सातव्या क्रमांकावर होता आणि विजयानंतरही त्याच स्थानावर कायम आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)